**S. Y. B. A.** Special Philosophy 2 Revised Study Material 2012
**Title of the paper** : History of Western Philosophy (Ancient, Medieval And Modern)
**Unit 6 :** Empiricism (Locke, Berkeley, Hume )
*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*

1

# UNIT 6

# EMPIRICISM

# अनुभववाद

**6.1 :जॉन लॉक** : प्राथमिक आणि दुय्यम गुणधर्म. उपजत कल्पनावादास नकार, इंद्रियसंवेदनाचा प्रातिनिधिक सिध्दान्त.

**6.2 :जॉर्ज बर्कले** : इंद्रियसंवेदनाचा प्रातिनिधिक सिध्दान्ताचे खंडन,अजडवाद.

**6.3 :डेव्हिड ह्यूम** : संशयवाद, वस्तुस्थिती - कल्पनांचे नाते, कार्यकारणाची समस्या, आत्मा.

## जॉन लॉकचा अनुभववाद

### प्रस्तावना

**जॉ**न लॉक हा ब्रिटीश तत्वज्ञ होय. त्याचा जन्म ग्रेट ब्रिटनच्या तत्कालीन ब्रिस्टल या बेटावरील रिंग्टन (Wrington) येथे 29 एप्रिल 1632 रोजी झाला. त्याचा पिता कायदेपंडीत आणि लष्करात कॅप्टन होता. आणि आई ही लॉकच्या लहानपणीचं निवर्तली. ती अत्यंत पवित्र मनाची आणि मायाळू होती. त्यांचे घर संस्काराने कर्मठ होते पण पवित्र, दूरदर्शी, प्रामाणिक आणि उदारमतवादी.

**John Locke**
(29 August 1632 – 28 October 1704),
*Father of Liberalism.*
an English philosopher and physician regarded as one of the most influential of Enlightenment thinkers.
One of the first of the British Empiricists
Following the tradition of Francis Bacon, he is equally important to social contract theory.



जॉनची प्रकृती अत्यंत नाजूक होती आणि त्यातच त्याला आई-वडिलांपासून क्षयरोग मिळाला होता. त्याचे प्राथमिक शिक्षण घरीच झाले. त्यांनतर त्याची उच्च शिक्षण सुप्रसिध्द असे Oxford विद्यापीठात झाले. नंतर तिथल्या काही विद्यापीठामध्ये आणि महाविद्यालयामध्ये त्याला शिक्षकाची नोकरी मिळाली. भोमकपट्टी शिकण्यावर कडक टिका केली आहे. त्याने वैदयक शास्त्रातही पदवी संपादन केली होती. काही काळ तो देशाचा व्यापार आयुक्तही होता. शेवटच्या काळात तो लंडनमध्ये राहीला आणि क्षयरोगाच्या दिर्घ आजाराने 1704 साली त्याचे निधन झाले. अतिशय श्रध्दाळू प्रेमळ व धार्मिक असलेल्या लॉकला मित्र फार आवडत असे. एका मित्राला लिहीलेल्या पत्रात तो म्हणतो. **''या जगात केवळ सत्याकरिता सत्यावर प्रेम करणे''** हा मानवाच्या पूर्णत्वाचा महत्वाचा भाग आहे. आणि सत्यावरचे प्रेम ही सर्व नैतिक सदगुणाची बीजभूमी असते.

लॉकची ग्रंथ पुढीलप्रमाणे :-

1) *An Essay Cocerning Human Understanding*
2) *Treatises on Government*
3) *Some Thoughts Eolucation*
4) *The Reasonableness on Christanity as delivered in the Scriptuers*

लॉकचा पहिला ग्रंथ तत्वचिंतनाच्या दृष्टिकोनातून जास्त महत्वाचा आहे हा ग्रंथ त्याने 1689-90 मध्ये लिहून जणू अठराव्या शतकाचे उदघाटनच केले.हा मानसशास्त्रीय ग्रंथ असून व्यक्तीच्या बौध्दीक स्वातंत्र्याच्या हक्काचा हा जणू जाहीरनामा मानवीबुध्दीवर चर्च आणि धर्मगुरुनी लाधलेल्या बंधनापासून तिला मुक्त करणे आणि तत्कालीन निरीक्षणवाद्यांना उत्तरे देणे ही उदिधष्टये त्याच्या ग्रंथांच्या लेखनामध्ये होती. मानवी ज्ञानाच्या मर्यादा आणि या ज्ञानाची गृहितके यांचे चिकित्सक परिक्षण करण्याचा त्याचा मुख्य उददेश होता.

लॉकने अनुभववाद मांडला.प्रत्यक्ष अनुभव हाच सर्व ज्ञानाचा एकमेव मार्ग आहे असे सांगून तो परंपरेविरुध्द बंड करतो आणि मानवी बुध्दीला मुक्त करु इच्छितो. लॉकचा अनुभववाद पुढीलप्रमाणे मांडता येईल.

## लॉकचे ज्ञानशास्त्र

लॉकच्या मते सर्व मानवी ज्ञान हे फक्त अनुभवातूनच येते अनुभवाशिवाय ज्ञानाला अन्यकोणताही मार्ग नाही केवळ इंद्रियसंवेदना याच आपल्या ज्ञानाचे मार्ग आहेत असे लॉक म्हणतो अनुभव हाच सर्व ज्ञानाचा मुलभुत स्त्रोत असल्याचे प्रतिपादन लॉक करीत असल्यामुळे लॉकला अनुभववादी (empiricist) असे म्हणतात. लॉकने त्याचे ज्ञानशास्त्र An Essay Concerning Human Understanding या ग्रंथात मांडले.

लॉकच्या मते, ही किया घडती कशी? अनुभव येतो कसा? तर आपले मन आपल्या इंद्रियांशी जोडलेले असते.इंद्रिये संवेदना स्विकारतात. संवेदना बाहय जगाच्या असतात. आपले मन हे एखाद्या को-या कागदासारख्या किंवा कोऱ्या पाटीसारखे असते. इंद्रिय संवेदनाच्या मार्गाने मनाचा बाह्य जगाशी संबंध येऊन मनावर बाह्य जगाचे संस्कार होतात आणि त्यातून जगाविषयी प्रतिमा तयार होते. आणि मग कल्पनांचा उगम मनात होतो. या को-या मनाला लॉक **कोरी पाटी (Tabula Rasa)** असे म्हणतो.

थोडक्यात आपल्या सर्व ज्ञानाचा उगम अनुभवातून होतो.आपले मन एखाद्या को-यापाटीसारखी कागदासारखे, रिकाम्या पेटीसारखे असते. त्यात कोणतेही संस्कार नसतात. कसलेही छाप, ठसे, कल्पना, तत्वे, सत्य, गुणधर्म काहीही नसते जन्मत:च बालकाचे मन पुर्णपणे संस्कारमुक्त होत असते. ही शुध्द कोरी करकरीत पाटी असते या को-या पाटीवर म्हणजे मनावर इंद्रिय संवेदनांच्या रस्त्याने बाहय जगाच्या प्रतिमा संस्कार करतात. आणि मग मन संस्कारातून भरत जाते. हे अतिशय सावकाशपणे, हळहळू घडते. ही ज्ञानाची जडणघडण असते. हे अनुभवाचे स्वरुप असते.

आता,अनुभव येतो म्हणजे काय होते ? तर लॉकच्या मते अगदी बालपणापासून आपले मन निरिक्षण करण्यास सुरुवात करते निरिक्षण म्हणजे वेगवेगळया ज्ञानइंद्रियांची वेदने असतात. वेदने आली की इंद्रिये ते मनाकडे पाठवितात आणि मन त्यावर चिंतन करते त्यातून ते संस्कार निर्माण करते. म्हणजे चिंतनाच्या मार्गाने संशय घेणे, विश्वास ठेवणे, जाणणे, ठरविणे विचार करणे या किया मन करु लागते. रंग, रुप, ध्वनी, गंध, स्पर्श, रुचि यासारख्या गुणधर्माचे ज्ञान मनाला होतो. आणि मन ग्रहण करते.

## निरीक्षण दोन प्रकारचे

1) बाह्य निरीक्षण : इंद्रियांनी ग्रहण केलेले संवेदन

2) अंतर्निरिक्षण : मनाच्या हालचालींचे ज्ञान.म्हणजे मनाने घेतलेला निर्णय. हे ज्ञान सुध्दा मनाने मनाला होते व तेही अंतर्निरिक्षणानेचं होते.

अशारितीने अंतर्निरिक्षण व बाह्य निरीक्षण या दोन्हीही मिळून *ज्ञान* या नावाची *घटना* तयार होते. तिचे वैशिष्टय म्हणजे ती ज्ञेय वस्तूपासून अगदी थेटपणे, प्रत्यक्षपणे (direct) मिळणारे असते.

संवेदनामध्ये बाहय वस्तू इंद्रियांमार्फत मनावर गुणधर्मांचे ठसे उमटवितात. मन याप्रकियेत केवळ ग्रहणशील असते. आणि निष्कीय राहते. बाहय निरीक्षणातून आत काहीतरी येते आणि आंतर्निरिक्षणातून त्याचे आकलन होते. त्यातून जी काही प्रतिमा तयार होते तिला लॉक कल्पना (idea) म्हणतो.

*थोडक्यात, संवेदना आणि आकलन यांचा थेट, प्रत्यक्ष विषय म्हणजे कल्पना*

ग्रहण प्रकियेमध्ये मन निष्क्रिय राहते, असे जे लॉक म्हणतो त्याचा अर्थ समजावून घेणे आवश्यक आहे. मन निष्कीय राहते याचा अर्थ बाहय वस्तूंचे जे ठसे जसे आहेत तसेच ते स्विकारते. ठसांच्या त्या संस्कारात ते ग्रहण काळामध्ये कोणताही बदल करीत नाही. उदा. झाडांच्या-पानांचा हिरवा रंग किंवा आकाशाचा निळा रंग अथवा ढगांचा गडगडाट आणि चिमण्यांचा चिवचिवाट. जसा ग्रहण होतो अशीच कल्पना आपले मन तयार करते. हेच स्पर्श, चव, असतात. तसेच मनाने समजावून घ्यावयाचे असतात म्हणजे संवदेनामध्ये वस्तुनिष्ठता आणि वास्तविक राखली जाते. त्यात ते कसलाही बदल करीत नाही. याचा अर्थ, मन निष्कीय राहते. म्हणजेच बाहय जगाचे वस्तुनिष्ठ ज्ञान होण्यासाठी मनाने निष्कीय असणे, ही आवश्यक अट असते.

## मनाची सक्रियता - मनाचे कार्य

मन ज्ञानात वस्तुनिष्ठ असते, निष्क्रिय असते हे खरे पण एकदा अनुभव घेतला की उत्तर क्षणाला तो त्याच्यावर प्रकिया करते. निरिक्षण, विचार, संशय, तुलना, निर्णय, संमिश्रण, सारासार विचार ही कार्ये मन करु लागते. नवीन कल्पनांची निर्मिती करु लागते. ही मनाची कार्ये असतात. म्हणजे मन सकिय होते. असे लॉक म्हणतो.

अशा रितीने निष्क्रिय असणे हे अनुभवजन्य वस्तुनिष्ठ ज्ञानासाठी आवश्यक असते तर त्यातून तयार होणा-या कल्पनांचे स्वरुप ठरविण्यासाठी ते सकिय होते.त्यातूनच नव्या कल्पनांचा जन्म होतो.नवे शोध लागतात. संस्कृतीचा विकास होतो. या कल्पनांमध्ये प्रकार असतात ते पुढीलप्रमाणे :-

## लॉकने केलेले कल्पनांचे प्रकार

1) **सरल कल्पना (Simple idea)**
2) **समिश्र कल्पना (Complex idea)**

सरल कल्पना म्हणजे साध्या किंवा निरवयच कल्पना होय. या फक्त एकाच ज्ञानेद्रियांमार्फत प्राप्त होणाऱ्या असून संवेदनांमार्फत तयार होणा-या या कल्पना निरवयव असतात.उदा:-रंग, रुची, थंडी, स्पर्श इ. या कल्पनांना लॉक *एकेंद्रिय कल्पना* म्हणतो.

संमिश्र कल्पना म्हणजे बहुइंद्रिय कल्पना होय. या कल्पना एकापेक्षा जास्त इंद्रियांमार्फत मिळतात त्यात दिशा, काल, घनता, विस्तार, गती, अशा संवेदनांचा समावेश असतो. म्हणजे एखादी वस्तु दुस-या पासून किती लांब आहे. उंच आहे इ. चे ज्ञान होते.

या दोन्ही कल्पना आपणांस संवेदनामार्फतच मिळतात. काही निरवयच कल्पना चिंतनाच्या स्वरुपाच्या असतात म्हणजे विचार करणे, संशय घेणे, विश्वास ठेवणे, निश्चय करणे, स्वरुपाचा कोणताही विचार यात सरल

अंतर्निरिक्षणाने प्राप्त होतात. तर काही कल्पना निरीक्षण चिंतन आणि संवेदना यांच्या संयोगातून मिळतात. उदा. सुख, दुख: अस्तित्व, वस्तू व्यक्तीची कमवारता इ. निरवय व कल्पना निष्क्रिय मन ग्रहण करते तर संमिश्र कल्पना सकिय मन तयार करते.

संमिश्र कल्पनांचेही लॉक दोन मुख्य प्रकार करतो.

***अ) द्रव्याविषयक संमिश्र कल्पना (Complex idea of substances)***

***ब) संबंधविषयक संमिश्र कल्पना (Complex idea of relations)***

यांचे स्वरुप पुढीलप्रमाणे :-

## अ) द्रव्याविषयक संमिश्र कल्पना

या प्रकारच्या कल्पनांमध्ये मूलद्रव्याची एक मध्यवर्ती कल्पना असते. उदा. रंग, वजन, टणकपणा इ. ही संमिश्र संकल्पना काही निरयव कल्पनांमधून तयार झालेली असते. उदा:- गव्हाची कणिक ही गहू, दळणे, पाणी आणि मिश्रणाची प्रकिया यांतून तयार होते. या द्रव्यविषयक कल्पनांचेही दोन उपप्रकार पडतात.

**1 एकवाची :** एकवाची द्रव्याच्या कल्पनेत माणुस, हरीण, कावळा इ. असे त्या-त्या समुहाचे प्रतिनिधित्व करणारी एक वस्तू असते.

**2 सामूहिक :** सामूहिक द्रव्य कल्पनेत सैन्य, शर्यत, पळणे, डोंगर-द-या, तारका अशा समुह असणा-या द्रव्यांचा तो समावेश करतो.

## ब) संबंधविषयक संमिश्र कल्पना

संबंध म्हणजे दोघांच्या तुलनेतून निष्पन्न होणारा संबंध. उदा:- बाप-मुलगा, मुलगी-आई, विदयार्थी-शिक्षक, लांब-जवळ, उंच-ठेणगा, कार्यकारण संबंध, ज्यामधून वस्तु किंवा व्यक्ती यांचे अंतर व संबंध कळेल ती संबंध विषयक कल्पना असते.

संमिश्र संकल्पनांमध्ये लॉकच्या मते, तीन मुख्य संमिश्र संकल्पना असतात. त्या अर्थातच साध्या संकल्पनांमधून येतात. या संकल्पनांचे प्रकार तीन, त्या व्यक्त होणा-या वस्तूंचेही प्रकार तीन आणि मनाच्या प्राकियेचेही प्रकार तीन असे लॉक म्हणतो. या तीन कल्पना म्हणजे,

**अ) विकार/परिणाम (Modes)**

**ब) द्रव्ये (Substances)**

**क) संबंध (Relations)**

विकार या अशा संमिश्र कल्पना आहेत की, त्या स्वतंत्र न राहता द्रव्य कल्पनेच्या आधाराने राहतात. त्या संबंध व्यक्त करतात. विकारांना स्वतंत्र अस्तित्व नसते. उदा:- त्रिकोण, खूण, कृतज्ञता या साध्या विकार कल्पना आहेत. या कल्पनांमध्ये इतर कल्पनांचा समावेश नाही.जसे:- डझन म्हणजे एकाच प्रकारच्या बारा वस्तू पण जर विकार संमिश्र असतील (mixed modes) तर त्यात साध्या निरअवयव कल्पनांचे मिश्रण असते. उदा:- सौदर्य या कल्पनेत आकार,रंग व पाहणा-यांचा आनंद अशा कल्पनांचे संमिश्र असते.

| साध्या कल्पना | संमिश्र कल्पना |
|---|---|
| **अ. संवेदना**<br>1) एकेद्रिय संवेदना :- पिवळा, थंडी, उष्णता इ.<br>2) बहुइंद्रिंय संवेदना :- आकृती,गति, स्थिती इ. | **अ. विकार**<br>1) साधे विकार :- डझन किंवा संख्या इं.<br>2) संमिश्र विकार :- सौदर्य. |
| **ब. चिंतन संवेदना**<br>स्मृति, निर्णय, विचार इ. | **ब. द्रव्यविषयक**<br>1) एकवाची दव्य :- मानव, हरीण, चिमणी इ.<br>2) बहुवाची द्रव्य :- सैन्य, घोळका, पळणे इ. |
| **क. संवेदना व चिंतने**<br>सुख, दु:,ख, शक्ती इ. | **क. संबंधविषयक**<br>1) आई-वडील, लहान-मोठा, कार्य-कारण इ. |

संवेदना बाह्य वस्तूंच्या असतात तर चिंतने ही त्या संवदेनावरील प्रतिकिया असते.चिंतन ही निरीक्षणातून येतात.निरीक्षणात मन सकिय झालेले असते. संवदेनात वस्तूंचे संवेदन होते तर चिंतनात विचारांचे संवेदन होते.याचा थोडक्यात तक्ता पुढीलप्रमाणे :-

## संवेदने व चिंतने यांचा तक्ता

| संवेदने | चिंतने |
|---|---|
| 1.संवेदनांच्या कल्पनांमध्ये इंद्रिये व मन हे ज्ञानमार्ग असतात. | 1. चिंतनांमध्ये फक्त मन हाच ज्ञानमार्ग असतो. |
| 2. बाह्यनिरीक्षण असते. | 2. आंतर्निरिक्षण असते. |
| 3. मन निष्क्रीय असते. | 3. मन निष्क्रीय असते. |
| 4. बाह्य वस्तूंचे ग्रहण असते. | 4. आंतरिक घडामोडीचे ज्ञान मनास होते. |

लॉकच्या मते संपूर्ण ज्ञानप्रकियेत आपले मन हे अतिशय महत्वाची भूमिका बजावते. हे कोणत्याही ग्रहणकालात म्हणजे ज्यावेळेस इंद्रिये संवेदना प्राप्त करतात, त्यावेळेस मन त्यावर कोणतीही प्रकिया करत नाही. परंतू, एकदा ठसे व कल्पना तयार झाल्या की, नंतर मात्र ते सकिय बनते आणि निर्णय घेते. निर्णय घेणे, विचार करणे इ. मानसिक आणि वैचारिक प्रकियांनाच लॉक चिंतने असे म्हणतो. आणि त्याच चिंतनातून ते संमिश्र कल्पना तयार होते.

थोडक्यात, लॉकच्या मते, ज्ञान फक्त अनुभवातुन येते. अनुभव विविध ज्ञानेंद्रियांद्वारा प्राप्त होतो. हा अनुभव म्हणजे विविध प्रकारचे ठसे असतात. ते मनाच्या को-या पाटीवर उमटतात. मन त्यांचा विचार करते. त्यातून साध्या निरवय व कल्पना तयार होतात. मनाकडून त्यांचे आंतर्निरिक्षण होते. आणि नंतर मन सकिय होऊन चिंतन करते. त्यातून संमिश्र कल्पना तयार होतात.

लॉकच्या मते, येणारा अनुभव सुटा-सुटा असतो नंतर गुंता-गुंत होते. जग केवळ विशिष्टय वस्तुंनी बनले आहे. त्या विशिष्टयांचाच अनुभव येतो. मन त्या विशिष्टयांचा अनुभव घेऊन सामान्य नियम अस्तित्वात येतो. अशारितीने आपल्या सामान्य ज्ञानाचा आशय हळूहळू विशिष्टय अनुभवातूनच तयार होतो जसे-जसे आपले वय वाढते तस-तसा ज्ञानाचा आशय जास्तीत-जास्त गुंतीचा आणि भरगच्च होत जातो.

हाच लॉकचा **अनुभववाद** होय !

लॉक इतका कठोर अनुभववाद का मांडतो ?

कारण लॉकला उपजत कल्पना या देकार्तच्या संकल्पनेवर हल्ला करावयाचा आहे.त्याचे स्वरुप पुढीलप्रमाणे :-

## लॉकच्या अनुभववादाचे परीक्षण

लॉकचा अनुभववाद हा पाश्चात्य तत्वज्ञानास एकूण विज्ञानास अतिशय उपकारक ठरला. त्याचे ज्ञानशास्त्र इंद्रियानुभव आणि मनाने केलेले चिंतन या दोन खांबावर आधारलेले आहे. चिंतनाला अनुभवाचा दर्जा देणारा लॉक हा पहिला तत्वज्ञ होता. लॉकच्या मते, आपला सर्व विचार हा विविध कल्पनांनी तयार होतो. पण कल्पना या मनामध्ये मूळात अस्तित्वात नसतात. तर कल्पना अनुभवातून तयार होतात. मन हे को-या करकरीत पाटीसारखे असते. अनुभव, त्याचे ठसे व त्यांच्याविषयीचे चिंतन यातून कल्पना तयार होतात. लॉकचा सिध्दांत हा देकार्तच्या उपजत कल्पना सिध्दांतांचे खंडन करण्यासाठी आला आहे.

देकार्तने, उपजत कल्पनांचा सिध्दांत मांडला होता. त्याहीपूर्वी इ.स. पूर्वी 300 वर्षे स्टोईक तत्वज्ञांनी उपजत कल्पना सिध्दांत मांडला. त्यानंतर देकार्त व देकार्तनंतर फ्रान्सीस बेकन आणि थॉमस हॉब्ज या तत्वज्ञानी उपजत कल्पना सिध्दांत स्विकारला. हा सिध्दांत संक्षेपात पुढीलप्रमाणे :-

देकार्तच्या मते, आपल्या मनात जन्मत:च काही ज्ञान उपजत असते. विशेषत: जेव्हा ईश्वराची संकल्पना आपणांस आंतर्निरीक्षणाने सापडते, तेव्हा ती कोठून येते, ती जन्मजात असते.त्या जन्मापासून मिळालेल्या असतात असे नव्हे, पण त्या बालपणीच आपल्या मनात असतात आणि योग्यवेळी त्या विकसित होतात. उदा. :- 2 + 2 = 4 शून्य म्हणजे काहीही नाही. ही कल्पना आपणांस सांगितल्यावर कळते व पटतेही. इतक्या या कल्पना सरल व स्पष्ट असतात. म्हणूनच आपण त्या स्विकारतो व त्याआधारेच आपण जन्मभर शिकत राहतो. थोडक्यात उपजत असणे म्हणजे जन्मजात असणे असे नाही तर त्या कल्पना व्यक्तीत योग्यवेळी प्रगट होण्याची क्षमता असते.उदा. :- ईश्वराची संकल्पना ही अशी उपजत असते, जन्मजात असते, म्हणूनच आपणांस बप्पा कळतो व स्विकारला जातो.लॉक या सिध्दांतावर हल्ला करतो. आणि त्याचा अनुभववाद मांडतो. त्याच्या मते, असे काहीही घडत नाही. उपजत कल्पना सिध्दांतावर तो पुढीलप्रमाणे टीका करतो.

## उपजत कल्पना सिध्दांताचे लॉकने केलेले खंडन

जर उपजत कल्पना प्रत्येक मानवी व्यक्तीच्या मनात खरोखरीच उपलब्ध असतील तर,

### 1) बालके आणि मूर्ख यांना उपलब्ध का नाही ?

समजा खरोखरच आत्मा असेल आणि उपजत कल्पना असतील तर त्यात लहान मुले व मूर्ख व्यक्ती यांनासुध्दा कळाल्या पाहिजेत. जन्माच्या वेळेसचं प्रत्येक बालकात त्या उपलब्ध असल्या पाहिजेत. पण वास्तवात प्रत्येक व्यक्तीला शिक्षण देऊन शहाणे करावे लागते. शिवाय काही माणसे मूर्ख असतात, असे हळूहळू लक्षात येते.

### 2) अनुभवपूर्वतेची अट :

कल्पना उपजत असतील तर त्या अनुभवपूर्व असल्या पाहिजे. याचा अर्थ अनुभव न घेता त्या आपोआप कळाल्या पाहिजे पण तसे घडत नाही. कारण व्यक्तीला शिकवून शहाणे करावे लागते. शहाणपणा जन्मजात नसतो.बौध्दीक विकास हा हळुहळु होत असतो.याचा अर्थचं शहाणपणा व बौध्दीकता ही अनुभवातूमन येणारी गोष्ट आहे. जन्मजात नव्हे.

### 3) नैतिक व धार्मिक संकल्पना :-

लॉकच्या मते, नैतिक व धार्मिक कल्पना यात कधीही जन्मजात असू शकत नाही जर त्या जन्मजात असल्या तर जगात सर्वत्र सारख्या राहिल्या असतात. म्हणजे जगात एकचं धर्म अस्तित्वात आला असता. पण तसे घडले नाही. कारण धार्मिक व नैतिक कल्पना स्थलकालावर अवलंबून असतात.

### 4) बाह्य ठसे व कल्पना :-

देकार्त व इतर जन्मजात कल्पनांच्या समर्थकांच्या मते, शिक्षण व सामान्य अनुभव यांच्यामुळे जन्मजात कल्पनांच्या अविष्कारात अडथळा येतो. तर लॉकच्या मते, असा काहीही अडथळा येत नाही. उलट जोपर्यंत अनुभव येत नाही तोपर्यंत कल्पना तयारच हात नसतात. अनुभवाचेच आपले सर्व ज्ञान तयार होते.

अशा रितीने लॉक जन्मजात कल्पनांवर कडक टिका करतो. लॉक ही टिका का करतो ?

कारण लॉकच्या मते जन्मजात किंवा उपजत कल्पना सिध्दांत हा लोकांवर अधिकार गाजविण्यासाठी त्यांना गुलाम करण्यासाठी जास्त वापरला गेला. ईश्वर आहे असे एकदा मान्य केले आणि तो मनात बसविला की ईश्वराच्या नावाने सत्ता गाजविणे, कोणत्याही धर्मवादयांना सोपे जाते. त्यामुळे लोकांना अज्ञानात ठेवणे, त्यांचे यंत्र बनविणे, त्यांना गुलाम करणे शक्य होते. उपजत कल्पना धर्माला अशारितीने उपयोगी पडल्या. पण त्यामुळे मानवजातीचे नुकसान होते. सत्ताधिकारी मानवजातीला गुलाम करतात. म्हणूनच उपजत कल्पना सिध्दांत नाकारला पाहिजे.

काही कल्पना आणि काही व्यावहारिक तत्वे सर्व लोकांच्या मनात चटकन ठसतात. उदा.:- जे असते ते असते. एकाच वस्तूला एकाचवेळी अस्तित्वात असणे व अस्तित्वात नसणे शक्य नाही.किंवा 2+2=4 या कल्पना सर्वांना चटकन समजतात आणि पटकन. म्हणून त्या जन्मजात असाव्यात असे म्हटले जाते. पण लॉकच्या मते हा युक्तीवाद खरा नाही तर फसवा आहे, चकविणारा आहे. एखादया तत्वाच्या बाबतीत सर्वाचे एकमत होत असते असे ससमजणेच चुकीचे आहे. सर्वाचे एकमत होते म्हणून कल्पना जन्मजात असतात असे सिध्द होत नसते. कारण वाद न घालता चटकन मान्य होणारे सत्य असे काही असेल तर शिक्षण व्यवस्थेला काय अर्थ उरला ? मानवी संस्कृती साहित्य संगीत, विज्ञान, तंत्रज्ञान हे शोध निरर्थकच ठरतील. पण वास्तवात आपणांस असे दिसते की आपल्या आजूबाजूला अशी किती तरी माणसे आहेत की ती जन्मजात कशी तरी जगतात, मरुनही जातात पण त्यांच्या हयातीत कित्येक गोष्टी समजतच नाही. म्हणून तर मतभेद होतात. कल्पना उपजत आहे, आणि त्यांचे भान नाही हे विसंगत आहे. मनात काही तरी असेल तर त्याची जाणीव असलीच पाहिजे.

अशारितीने, ज्या उपजत कल्पनांचा पुरस्कार स्टोईक, प्लेटो, देकार्त, लायबने व तसेच इतिहासकार, कलावंत, इ. नी केला. त्यांची सत्यता, युक्तता आणि अस्तित्व लॉकने पूर्णपणे नाकरले. पण ते नाकरण्याची पध्दती मानसशास्त्रीय विश्लेषक आणि वैज्ञानिक आहे. लॉक मानवाच्या शिक्षणपदधतीवर, निर्मिती क्षमतेवर, माणूसपनावर, विश्वास ठेवतो. सर्व ज्ञान अनुभवातूनच निर्माण होते, असे तो मांडतो.

---


## जॉर्ज बर्क्लेचा चिद्‌वाद

लॉकच्या अनुभववादी संप्रदायाचा वारसा जॉर्ज बर्क्लेला (George Berkeley) मिळाला होता व त्याने लॉकची विचारपध्दती व अनुभवाचे विश्लेषण तशाच पध्दतीने पुढे चालू ठेवून त्याच्या विचाराची दिशा तशीच कायम ठेवून त्याचे तर्कशुध्द निष्कर्ष काढले. बर्क्ले हा जरी लॉकच्या नंतरचा महत्वाचा अनुभववादी तत्वज्ञ होऊन गेला तरी तो लॉकचा आंधळा अनुयायी होता.

बर्क्ले हा आयरिश बिशप होता. त्याची चिद्वादी भूमिका मध्ययुगातील आयरिश पंडित जॉन स्कॉटस एरिजेना याची आपणांस आठवण करुन देते.तो अत्यंत सूक्ष्म चिकित्सक व साक्षेपी वृत्तीचा असूनही त्याच्याजवळ बालसदृश्य धार्मिक श्रध्दा होती. त्याच्याजवळ ज्ञानाची अतृप्य आकांशा होती आणि त्याचबरोबर उत्कट मिशनरी सेवेची दुर्दम्य तळमळ होती.राइसने बर्क्लेविषयी *'बर्क्ले प्लेटोचे अस्सल अपत्य होता. ज्याचे मूळ त्याच्यापासून खूप दूर व दैवी स्वरुपाचे होते, अशा वंशाचा तो वारसदार होता'* असे म्हटले आहे. त्याच्या ऐन तारुण्यात त्याने साहित्याचे व तत्वज्ञानाचे सर्जन सुरु केले.आपली बौध्दिक देणगी त्याने मानवजातीस खूपच लवकर अर्पण केली. बर्क्लेने आपले लेखन वयाच्या चोवीसाव्या वर्षी प्रसिध्द करावयास सुरुवात केली, ह्यूमने वयाच्या अठठाविसाव्या

वर्षी, देकार्तने एक्केचाळीसाव्या वर्षी, तर लॉकने अठ्ठावन्नाव्या वर्षी आपले विचार प्रसिध्द करावयास सुरवात केली.

**George Berkeley**
(12 March 1685 – 14 January 1753)
known as **Bishop Berkeley**
an Anglo-Irish philosopher
whose primary achievement was the advancement of a theory he called "immaterialism" (later referred to as "subjective idealism"



जॉन बर्क्लेचा जन्म आयर्लंडमध्ये किल्केनीजवळील (Kilkenny) किल्क्रीन (Kilecrene) येथे 12 मार्च 1685 मध्ये एका इंग्लिश कुटुंबात झाला. त्याच्या बाळपणाची अधिक माहिती उपलब्ध नाही. वयाच्या अकराव्या वर्षी त्याला किल्केनीच्या महाविद्यालयात पाठविण्यात आले आणि 1700 मध्ये त्याच्या वयाच्या पंधराव्या वर्षी डब्लिन येथील ट्रिनिटी कॉलेजात त्याने प्रवेश केला. तेथे गणित, भाषा, तर्कशास्त्र व तत्वज्ञान या विषयांचा अभ्यास करुन 1704 मध्ये त्याने बी. ए. ची पदवी संपादन केली. 1707 मध्ये त्याने आपले Arithmetica आणि miscellanea mathematica प्रसिध्द केल्यावर त्याच वर्षी जूनमध्ये तो त्याच कॉलेजात फेलो झाला.महाविद्यालयात अध्ययन करीत असता त्याला लॉकच्या प्रबंधावर खूप चर्चा चालू असल्याने आणि न्यूटन, बॉईल, मालब्रांश, देकार्त व लायब्निझ यांच्या ग्रंथाचे व्यापक प्रमाणावर वाचन होत असल्याचे आढळून आले.त्याच्या लहान वयातच आपले तात्विक चिंतन तो ज्यात लिहून ठेवीत असे त्याचे नाव त्याने Common Place Book असे ठेविले होते. त्यात त्याने जे लिहून ठेविले होते, त्यावरुन त्याच्या मनावर लॉक व मालब्रांश यांचा बराचसा प्रभाव पडलेला होता असे दिसते.

पदवीधर झाल्यानंतर डब्लिन येथे बर्क्ले ट्यूटर व फेलो म्हणून पांच वर्षे राहिला. 1709 मध्ये इंग्लिश चर्चमध्ये डीकॉन (Decon) म्हणून त्याची नेमणूक झाली. त्यानंतर 1709 मध्ये त्याने An easy Towards a New Theory of Vision हा आपला अत्यंत महत्वपूर्ण ग्रंथ प्रसिध्द केला. यात त्याने आपल्या दृष्टीने विषयांच्या समस्यांची आणि अंतर, आकार व स्थान याविषयींच्या निर्णयांच्या आधाराची चर्चा केली आहे. त्याने आपल्या चिद्वादी किंवा अभौतिकाचा वादाच्या भूमिकेचा पुरस्कार A Treatise Concerning the Principles of Human Knowledge या पुस्तकाच्या 1710 मध्ये प्रसिध्द केलेले Three Dialogues between Hyles and Philonous या पुस्तकात केलेला आहे. नंतर बर्क्ले लंडनला गेला. तेथे त्याला राणी ॲनीच्या दरबारात प्रवेश मिळाला आणि ज्या मंडळात स्टील (Steal), स्विफ्ट (Swift), ॲडिसन (Addison) आणि पोप (Pope) असत त्यात त्याने प्रवेश केला.तेथे बर्क्लेला दरबारी जीवन पाहून जरी धक्का बसला होता तरी त्याने विनम्रता, शहाणपण, नि:स्वार्थता व इतरांविषयींची आस्था या त्याच्या गुणांचा लोकांवर खूपच प्रभाव पाडला व ज्याचा ज्याचा त्याच्याशी संबंध आला त्या त्या सर्वांवर त्याच्या व्यक्तिमत्वाची मोहिनी पडली. 1713-14 व 1716-1720 या कालखंडात त्याने युरोपीय दोन प्रवास केले आणि इटलीत बराच काळ घालविला व तेथे वाड्मयाचा अभ्यास केला.

बर्क्लेचे लेखन विविध स्वरुपाचे होते. 1712 मध्ये बर्क्लेने Passive Obedience या शीर्षकाची लहानशी पुस्तिका प्रसिध्द केली. 1721 मध्ये लॅटिनमध्ये त्याने De Motu आणि An essay Towards Preventing the Ruin of Great Britain हे पुस्तक प्रसिध्द केले. अमेरिकेत असताना त्याने लिहिलेले

Alciphron आणि The Minute Philosopher नावाचे पुस्तक 1732 मध्ये त्याने लंडनमध्ये प्रसिध्द केले. 1734 मध्ये त्याने The Analyst or a Discourse Addressed to an Infidel Mathematician हा ग्रंथ प्रसिध्द केला. त्यात त्याने न्यूटनच्या उपपत्तीवर टीका केलेली आहे. आणखीही त्याचे थोडे फुटकळ लेखन आहे.

बर्क्ले हा केवळ तत्वचिंतकच नव्हता. तो एक चांगला जिद्‌दीचा व कळकळीचा कार्यकर्ताही होता. सामान्य जनतेचे व्यावहारिक जीवनात भौतिक व आध्यात्मिक कल्याण करावे अशी त्याला कळकळ वाटत होती. बर्म्युडा (Bermuda) बेंटावर इंग्लिश मळेवाले व तेथील रहिवासी व तेथील रहिवासीस इंडियन्स यांच्या मुलांना शिक्षण देण्याकरिता तेथे एक कॉलेज काढावे अशी त्याची कल्पना होती व तिला आर्थिक साहाय्य मिळविण्यासाठी त्याने स्वत: इंग्लंडला जाऊन राजाचे व सरकारचे मन तयार करण्याचे प्रयत्न केले.

ऑक्सफर्डला राहावयास गेल्यानंतर थोडयाच महिन्यात 14 जानेवारी 1753 रोजी तिस-या प्रहरी त्याची पत्नी त्याला First Corinthians मधील पंधराव्या प्रकरणांतील काही भाग चहाच्यावेळी वाचून दाखवीत असता अत्यंत शांतपणे त्याची ह्‌दयक्रिया बंद पडून त्याने इहलोकाचा निरोप घेतला.त्याची कन्या त्याला चहाची आणखी एक कप येऊ लागली तेव्हा तिच्या लक्षात आले की तिच्या पित्याचा आत्मा त्यांच्या कोणाच्या लक्षातही न येऊ देता अनंतात विलीन झाला होता. अशा रितीने त्या सत्पुरुषाने आपली इहलोकींची यात्रा संपविली. ऑक्सफर्ड येथील ख्राइस्ट चर्च चॅपेलमध्ये त्याचे दफन करण्यात आले.

## बर्कलेपुढील समस्या

लॉकच्या ज्ञानविषयक उपपत्तीपासून तात्विक अनुभववादाचा विकास सुरु झाला. वस्तू विस्तार, घनता, गतिमानता, रंग, ध्वनी, रुची, गंध स्पर्श ही वेदने निर्माण करतात असेस लॉकचे म्हणणे आहे.यापैकी जे प्राथमिक गुणधर्म असतात ते वस्तूंच्या प्रतिकृती (Copies) असतात. आणि इतर वेदने वस्तूंच्या ठिकाणी असणा-या शक्तींचे आपणांवर होणारे परिणाम असतात. वेदने मनाला कच्चा माल पुरवितात व ती आपल्या ज्ञानाची जणू मुळाक्षरे असतात. वेदनांची रचना, संयोग, वियोजन करणे व त्यांच्यात संबंध जुळविणे व मार्गाची आत्मा त्यांच्यावर कार्य करीत असतो. आत्मा स्वत:च्याही कृतींवर चिंतन करतो. आपले सर्व ज्ञान अनुभवातील घटनांमध्ये मर्यादित राहाते. आपणांस फक्त 'आपल्या कल्पनांचे' प्रत्यक्ष ज्ञान होत असते. शिवाय बाह्य जग असते हेही आपणांस माहीत असते, परंतु ते ज्ञान आपल्या स्वत:च्या कल्पनांइतके स्पष्ट व स्वयंप्रकाशी नसते.

बर्क्ले लॉकच्या व मूलभूत अनुभववादाचा उपयोग करुन चिद्वाद (Idealism) प्रस्थापित करतो आणि त्याच्या पदतीने भौतिकवादाचे व निरीश्वरवादाचे खंडन करतो. लॉकने दावा केल्याप्रमाणे आपल्या ज्ञानाचा पाया इंद्रियवेदन व चिंतनही असतो, आणि आपणांस फक्त कल्पनाच समजू शकतात हे जर खरे असले तर आपणांस आपल्या बाहेरील भौतिक वस्तूंनी भरलेले मूर्त जग कसे समजू शकेल ? जडद्रव्याच्या ज्ञानाचा विचार करता आपण आपल्या जाणिवेच्या कक्षेतच अडकलेले राहातो. आपणांस आपल्या कल्पनांची भौतिक मूर्त द्रव्याशी तुलना करता येऊ शकत नाही. भौतिक वस्तू असतात की नाहीत व कशा असतात यांविषयी आपणांस काहीही समजत नाही.

आणि समजा जरी मनाच्या बाहेर जडद्रव्य अस्तित्वात असले तरी लॉकच्या उपपत्तीनुसार ते आपणांस कसे समजू शकेल हा प्रश्नच आहे. पण जड द्रव्य अस्तित्वात असते तर आपण गृहीत धरले तर आपण संशयवादात अडकून पडतो. आणि स्वतंत्र जडद्रव्य व शुध्द दिक्‌चे जग जर अस्तित्वात असले तर ईश्वराबरोबर दुसरी अपरिमित, शाश्वत व अपरिवर्तनीय सत्ता असेल व ती ईश्वराला मर्यादा घालील, एवढेच नव्हे, तर ईश्वराचे अस्तित्व अमान्यही करील.म्हणजे जडद्रव्यावरील विश्वापासून निरीश्वरवाद व भौतिकवाद यांची निष्पत्ती होते. जडद्रव्याचे व जड वस्तूंचे जग असते अशा भौतिकवादी दृष्टिकोनामध्ये संशयवाद, निरीश्वरवाद आणि अधर्म यांचा अंतर्भाव असतो. म्हणजे जडद्रव्य अस्तित्वात असत अशा गृहीतत्वाचा अस्वीकार केल्यानेच आपणांस ज्यापासून हे व्यंजितार्थ निष्पन्न होतात ते व्यर्थ व्यंजितार्थ टाळता येतील. पण परम आत्मा व आत्मिक शक्ती आणि

मुख्यत: ईश्वराचे अस्तित्व जर मान्य केले तर अशा गृहीतत्वाशिवाय आपणांस विश्वाचे व सर्व वास्तव ऐहिक घटनांचे उपपादन करणे शक्य होईल. बर्क्लेच्या दृष्टीने सर्वात महत्वाचा प्रश्न आहे. जडद्रव्याचे जग स्वतंत्र व मनाच्या बाहेर अस्तित्वात असते का ? ज्ञानाच्या या समस्येचा परिहार करण्याचे सामर्थ्य व क्षमता मानवी मनाजवळ असते याविषयी बर्क्लेस विश्वास वाटतो. मानवी मन:शक्तींच्या मर्यादांमुळे आपणांस अज्ञान असते असे समजणे चूक आहे असे बर्क्लेला वाटते. ईश्वराने प्राण्यांच्या मध्ये ज्या क्षुधा स्थापित केलेल्या आहेत यांची तृप्ती करण्याची साधने पुरविण्याची व्यवस्था ईश्वराने केलेलीच असते. मात्र या क्षुधाचा मानवाने नीट उपयोग केला पाहिजे, असे बर्क्लेचे मत आहे. आपल्या मन:शक्तींचा आपण योग्य उपयोग केल्यास आपल्या क्षुधा आपण तृप्त करु शकू आणि सत्य तत्वांपासून टिकण्यासारखे निष्कर्ष काढता येतील म्हणून मानवी ज्ञानाच्या तत्वांचे काटेकोर अन्वेषण, पृथक्करण व परीक्षण करणे इष्ट ठरेल.

इंग्लिश अनुभववादाचा लॉकपासून ह्यूमपर्यत विकास होत गेलेला आहे. त्याचा विकास हा प्रामुख्याने सद्वस्तुशास्त्रीय नसून ज्ञानशास्त्रातील आहे. 'आपणांस कशाचे ज्ञान होऊ शकते' असा प्रश्न लॉक उपस्थित करतो आणि आपणांस फक्त कल्पनांचेच (Idea) ज्ञान होऊ शकते असे तो उत्तर देतो. त्याचबरोबर एका बाजूला तो आध्यात्मिक द्रव्याचे व दुस-या बाजूला भौतिक द्रव्याचे अस्तित्व गृहीत धरतो. यांपैकी कोणतेही कल्पना नाही. बर्क्लेची लॉकपासून पुढे व ह्यूमची बर्क्लेपासून पूढे जी प्रगती झालेली आहे ती निरसनाची (Cancellation) आहे. बर्क्लेने भौतिक जडद्रव्याचे निरसन केले. कारण भौतिक द्रव्य कल्पना नाही. विचाराचा तोच धागा कायम ठेवून ह्यूमने पुढे प्रश्न विचारला, ''त्याच कारणासाठी आध्यात्मिक द्रव्याचे निरसन का करु नये ?'' आध्यात्मिक द्रव्य ही कल्पना किंवा ज्ञानाचा विषय नसते. जसा आपणांस भौतिक द्रव्य गृहीत धरण्याचा अधिकार नाही, तसाच आध्यात्मिक द्रव्य गृहित धरण्याचा अधिकार नाही. अस्तित्वात असणा-या जर कोणत्या गोष्टी असतील तर फक्त आपल्या कल्पना असतात.

1. लॉक - आध्यात्मिक द्रव्य - कल्पना - भौतिक (जड) द्रव्य
2. बर्क्ले - आध्यात्मिक द्रव्य - कल्पना,
3. ह्यूम - कल्पना

बर्क्ले तर्कशुध्द रीतीने लॉकच्यापुढे गेला, पण ह्यूमने लॉकची भूमिका संपूर्णपणे तर्कशुध्द सुसंगतीने विकसित करुन दाखविली. सर्व ज्ञान इंद्रियसंवेदनातून मिळत असते या गृहीतकापासून इंग्लिश अनुभववादात झालेल्या प्रगतीचा इतिहास हा ज्ञानावर आलेल्या बंधनांचा इतिहास आहे.

बर्क्ले लॉकने केलेले मानसशास्त्रीय विश्लेषण मान्य करतो. सर्व ज्ञान कल्पनांच्या मार्फत होत असते हा लॉकचा मूलभूत सिध्दान्तही तो मान्य करतो. लॉकने शास्त्रीय दृष्टया कल्पनांचे केलेले वर्गीकरणही त्याला मान्य आहे. इंद्रियसंवेदन हा चिंतन ही ज्ञानाची दोन प्रमुख साधने आहेत हेही लॉकचे म्हणणे बर्क्लेला मान्य आहे. निरवयव कल्पना इंद्रियसंवदेनाने व मनाच्यसा व्यापारांचे अंतिर्निरीक्षण करण्याने मिळतात व त्यांचा स्मृती व कल्पना शक्ती यांच्या साहाय्याने संयोग करुन संमिश्र कल्पना तयार केल्या जातात ही मनाची कार्यप्रवृत्तीनही बर्क्लेला मान्य आहे.

या व्यतिरिक्त केवळ लॉकलाच नाही तर सर्व प्रबोधन कर्त्यांप्रमाणेच व्यक्तीच्या आत्म्याचा स्वातंत्र्याचे तत्व आहे आणि त्यालाच बर्क्ले मन (mind), आत्मा (Soul of Self) किंवा चित्तत्व (Spirit) म्हणतो.आणि कल्पनांचे संवेदन ज्याला होत असते ते वेगळे तत्व असते.म्हणून सर्व ज्ञानाचा उगम इंद्रियसंवेदनातून होत असतो आणि आध्यात्मिक द्रव्य अस्तित्वात असते या दोन्ही बाबतीत बर्क्ले लॉकशी सहमत आहे.

पण त्याचबरोबर ज्याप्रमाणे लॉक ‘उपजत कल्पनांची‘ उपपत्ती खोडून काढल्याशिवाय स्वत:चे अनुभवाधारित मानसशास्त्र  रचू शकला नाही तसा बर्क्लेही लॉकच्या ’अमूर्त कल्पनांची’ संकल्पना खोडून काढल्याशिवाय आपली चिद्वादी भूमिका प्रस्थापित करण्यात प्रगती करु शकला नाही.

## अमूर्त कल्पनांना नकार

बर्क्लेला लॉकच्या अमूर्त कल्पना मान्य होत नव्हत्या.  घरे, पर्वत, नद्या, तारे, वृक्ष, जनावरे यांसारख्या बाह्य वस्तूंना नैसर्गिक व वास्तव अस्तित्व असते व त्यांचे अस्तित्व जाणणा-या मनाच्या निरपेक्ष असते असे मत बनविण्यास मुख्य कारण मनाला अमूर्त कल्पना रचता येतात हा सिध्दात आहे.  पण खरे पहाता अमूर्त कल्पना रचण्याची क्षमता मनापाशी नसते.  आपण ज्या विशिष्ट वेगवेगळया वस्तू व घटना पाहात असतो त्यांच्या कल्पना आपण कल्पनाशक्तीने आपल्या मनासमोर उभ्या करु शकतो. आपण त्यांचे विश्लेषण, विभाजन व संयोजन करु शकतो.  अशा अमूर्त कल्पना आपणांस कधीच अनुभवायला मिळत नाहीत. आणि अमूर्त कल्पना ज्या शब्दांनी निर्देशित केल्या जातात ते फक्त शब्द असतात व शब्दाहून अधिक इतर काहीही नसते.  उदा. त्रिकोणाच्या सामान्य कल्पनेला अनुरुप असा कोणताही सामान्य त्रिकोण वास्तव जगात अस्तित्वात नसतो.  म्हणजे समभुज, समकोन किंवा विषमभुज यांपैकी कोणताही नसलेला असा त्रिकोण असूच शकत नाही.  अर्थात कोनांच्या व बाजूंच्या विशिष्ट स्वरुपाकडे व संबंधाकडे लक्ष न देता एखाद्याला त्रिकोणाकृतीचा विचार करणे शक्य होईल हे खरे, पण यावरुन आपणास त्रिकोणाची अमूर्त कल्पना रचता येईल असे मात्र सिध्द होऊ शकत नाही.त्याचप्रमाणे विशिष्ट स्वरुपाकडे व संबंधाकडे लक्ष न देता एखाद्याला त्रिकोणाकृतीचा विचार करणे शक्य होईल हे खरे, पण यावरुन आपणास त्रिकोणाची अमूर्त कल्पना रचता येईल असे मात्र सिध्द होऊ शकत नाही.

तसेच विशिष्ट गतिमान पदार्थाशी संबंध नसलेली, म्हणजे जी जलदही नाही व मंदही नाही.  निरपेक्ष किंवा रिक्त दिक् किंवा विस्तार आपणांस कधी दिसू शकत नाही अशी रेषा, पृष्ठभाग, घन यासारखेच काहीच नाही असा व्यापक कल्पनेतही आपल्यासमोर आणता येत नाही.त्याचप्रमाणे जो रंग तांबडा, निळा, पांढरा किंवा कोणताही विशिष्ट रंग असणार नाही अशा सामान्य व अविशिष्ट रंगाची अमूर्त कल्पना करणे शक्य नाही.  तसाच मनुष्य म्हटला की तो विशिष्ट रंगाचा, अंगकाठीचा, उंच, ठेंगणा, काहा, गोरा, सडपातळ, असा कोणत्या तरी गुणधर्मांचा असलाच पाहिजे.यांपैकी कोणताही नसून, केवळ ’बुध्दीशाली, पंखविरहित, द्विपाद प्राणी’  असा मनुष्य वास्तव सृष्टीत कोठेच पाहावयास मिळणार नाही.  तसेच शरीर, प्राण, ज्ञानेंद्रिये, स्वयंजनित गती असणारा पण विशिष्ट आकार, आकृती नसलेला, शरीरावर केस, पंख, खवले नसलेला, पण त्याचबरोबर नग्न नसलेला, आणि चालणे, उडणे, सरपटणे यांसारखी कोणतीही स्वयंजनित गती नसलेला, अशा कोणत्याही सर्वसामान्य प्राण्याची (जनावराची) अमूर्त कल्पना आपणास रचता येणे शक्य नाही.

## नामवाद (Nominalism)

सामान्य व अमूर्त कल्पना ही दुसरे तिसरे काहीही नसून केवळ एक ‘शब्द’ असते.  सामान्य कल्पना ही एक विशिष्ट वस्तू दर्शविणारा शब्द असते व तो शब्द त्या प्रकारच्या वस्तू व कल्पना व्यक्त करण्यासाठी सतत वापरल्याने ‘सामान्य’ (General) बनत असतो. म्हणजे एकाच प्रकारच्या सर्व विशिष्ट कल्पना व्यक्त करण्यासाठी आपण एकच शब्द प्रतीक किंवा चिन्ह वापरतो व त्यावरुन आपणांस असे वाटू लागते  की त्या सर्वांनाा अनुलक्षून एक अमूर्त कल्पना असते. आपल्या ज्ञानाच्या संज्ञापनासाठी व विस्तारासाठी अशा अमूर्त समजल्या जाणा-या कल्पनांची जरुर असते.वैज्ञानिक गणितीय व तात्विक सत्यांच्या शोधासाठी व संज्ञापनासाठी सामान्य कल्पना पुरशा असतात.  अमूर्त व *‘सामान्य कल्पना’* या फक्त नावाने किंवा शब्दाच्या रुपानेच असू शकतात. शब्दापलीकडे त्यांना वेगळे अस्तित्व नसते. तो सामान्य शब्द कोणत्याही वास्तव घटनेचे किंवा वस्तूचे

वर्णन करु शकत नाही. ही भूमिका *नामवादाची (Nominalism)* आहे, म्हणजे ’अमूर्त कल्पना’ किंवा ‘सामान्य’ ही केवळ नावे (Names) असतात.

बर्क्लेच्या मते ज्या जगात मन नाही असे केवळ जडसृष्टीचे किंवा निसर्गाचे जग हेसुध्दा एक अमूर्त कल्पना आहे. इंद्रियसंवेद्य वस्तूंना आपण त्यांच्या होणा-या संवेदनापासून अलग करतो आणि असंवेदित जडद्रव्य असते अशी कल्पना करतो. पण ज्याचे संवेदन होत नाही असे अस्तित्व असणे शक्यच असते. कोणत्याही वस्तूचे आपणांस प्रत्यक्ष वेदन न होता ती आपणांस दिसू किंवा भासू शकत नाही. किंवा जिचे आपणांस वेदन किंवा संवेदन होऊ शकत नाही, म्हणजे तिच्या वेदनापासून किंवा संवेदनापासून जी संवेद्य वस्तू भिन्न असते अशा वस्तूची आपणांस कल्पनासुध्दा करता येणे शक्य नसते. असंवेद्य द्रव्याची कल्पना एक प्रकारचे अमूर्तीकरण आहे असा बर्क्लेचा आक्षेप आहे.जगात वस्तू आहेत हे आपणांस केवळ कल्पनांच्या मार्फत समजते आणि कल्पना मनाशिवाय असू शकत नाहीत. कल्पनांना मनातच अस्तित्व असते. मनाव्यतिरिक्त कल्पनांची कल्पनाही करवत नाही.कल्पनांचे जे ज्ञान होते, किंवा संवेदन होते ते संवेदन मनाशिवाय होऊच शकत नाही.

‘वस्तूंना अस्तित्व असते’ या विधानाचा नेमका अर्थ काय असतो याची बर्क्ले चिकित्सा करतो. संवेद्य वस्तूंना अस्तित्व असते असे जेव्हा आपण म्हणतो तेव्हा ’संवेद्य’ शब्दाचा नेमका अर्थ कोणता असतो याचा विचार करताना तो म्हणतो, ‘मी ज्या टेबलावर लिहितो ते आहे असे जेव्हा मी म्हणतो तेव्हा त्याचा अर्थ मी ते पाहातो व ते मला जाणवते (feel) आणि मी खोलीच्या बाहेर गेल्यानंतरही ‘खोलीत टेबल आहे’ असे मी म्हणतो तेव्हा माझ्या म्हणण्याचा आशय असा असेल की जर मी तेव्हाा खोलीत असतो किंवा असेन तेव्हा ते मला दिसले असते किंवा दिसेल, किंवा इतर कोणत्या तरी व्यक्तीला ते प्रत्यक्ष असेल. एखाद्या ठिकाणी गंध होता याचा अर्थ कोणीतरी तो हुंगला होता.

एखाद्या ठिकाणी ध्वनी होता असे म्हटल्यास तो कोणाला तरी पाहायला मिळाला असला पाहिजे. म्हणजे वस्तू अस्तित्वात असते तेव्हा नेमके काय असते असा विचार केला असता त्यांचे मला किंवा माझ्यासारखी जाणीव असणा-यांना इंद्रियसंवेदन होत किंवा झालेले असते एवढाच अर्थ होतो. पण जाणीवरहित जडद्रव्य असते,आणि त्याचा कोणाही संवेदनक्षम मनाशी किंवा ज्ञात्याशी कोणत्याही प्रकारचा संबंध नसतो व तरीही त्याला अस्तित्व असते असे म्हणणे हे अर्थविहीन व अनाकलनीय असते असे बर्क्ले म्हणतो. म्हणजे ‘वस्तूंचे किंवा घटनांचे अस्तित्व त्यांच्या होणा-या इंद्रियसंवेदनात सामावलेले असते’ किंवा त्यांचे संदेवन होणा-या व त्यांचा विचार करणा-या मनाच्या बाहेर वस्तूंना अस्तित्व असते या म्हणण्याला काहीच अर्थ राहात नाही.

संवेदनाचे किंवा वेदनाने जेव्हाा आपणांस वस्तूचे ज्ञान होते तेव्हा ज्या वस्तूंचे आपणांस ज्ञान होते तिच्या गुणधर्माची आपणांस जाणीव होत असते.

## गुणधर्म : प्राथमिक आणि दुय्यम

आपणास एखाद्या वस्तूचे ज्ञान होते म्हणजे नेमकी ती वस्तू कळते का हे तिचे ज्ञान कसे होते याचा विचार केल्यास लक्षात येते. उदा. आपण एखादी फळाचे ज्ञान कसे होते ते पाहिल्यास फळ समजते याचा अर्थ त्या फळाचा रंग, आकार, वास, चव, स्पर्श या गुणधर्मांचे आपणांस ज्ञान होत असते. फळांचे हे गुणधर्म ज्ञानेंद्रियांना समजतात व ते सर्व गुणधर्म पुंजक्यांनी सतत एकत्र पाहावयास मिळतात.

ज्ञानेंद्रियांना प्रतीत होणारे संवेदनक्षम गुणधर्म हे पाहाणा-याच्या संवेदनावर अवलंबून असतात म्हणून ते ज्ञातृसापेक्ष किंवा व्यक्तिनिष्ठ असतात, व अशा संवेदनीय किंवा संवेदनक्षम किंवा वेदनक्षम गुणधर्मांनाा लॉक *’दुय्यम’ किंवा ’गौण’ गुणधर्म (Secondary qualities)* अशी संज्ञा देतो. लॉकच्यास मते ’वस्तूंच्या ठिकाणी विशिष्ट कल्पना निर्माण करण्याची जी क्षमता किंवा सामर्थ्य असते ते म्हणजे दुय्यम गुणधर्म’ होत.

वस्तूंचे जे गुणधर्म मानवांनी त्यांचे अनुभव घेण्यावर व संवेदन करण्यावर अवलंबून असतात व ते प्रत्यक्ष वस्तूंच्या ठिकाणी नसतात असे मानले जाते. अशा गुणधर्मांना *'दुय्यम गुणधर्म'* *(Secondary qualities)* म्हटले जाते. पण आणखी काही गुणधर्म असे असतात की ते ज्ञात्याच्या संवेदनावर किंवा अनुभवावर अवलंबून नसतात, व तेप्रत्यक्ष वस्तूंच्या ठिकाणीच असतात, उद. विस्तार, आकृती, गती हे गुणधर्म वस्तूंच्या ठिकाणीच असतात व म्हणून त्यांना ज्ञातृसापेक्षत्व नसते आणि वास्तविकता वस्तुगतता (objectivioyty) असते, व हे गुण दुय्यम गुणधर्मांना धारण करीत असतात, व म्हणून लॉक त्यांना 'प्राथमिक गुणधर्म' (Primary qualities) मानतो. प्राथमिक गुणधर्म जाणा-यांच्या विविधतेप्रमाणे बदलणारे नसतात. ते वस्तूंच्या ठिकाणी स्थिर व नियमितपणे असतात आणि इंद्रियानुभवावर त्यांचे अस्तित्व अवलंबून नसते असे लॉक म्हणते. पण प्राथमिक व दुय्यम गुणधर्मात लॉक जो अशा प्रकारचा फरक करतो तो बर्क्लेला मान्य नाही. या पध्दतीने विस्ताराचा व गतीचा विचार केल्यास ती अमूर्त कल्पना ठरतील व ती अशक्य ठरतील. रंग,रुची, तापमान यांचा केवळ मनामध्ये अस्तित्व असते व वास्तव भौतिक वस्तूंमध्ये नसते हे सिध्द करण्यासाठी जे युक्तिवाद केले जातात तेच युक्तिवाद विस्तार, आकृती, गती यांनाही मनाबाहेर अस्तित्व नसून रंग, रुची याप्रमाणे केवळ मनामध्येच अस्तित्व असते असे सिध्द करण्यासाठी वापरता येतील असे बर्क्ले म्हणतो. कारण विस्तार, आकृती, गती याविषयींच्या आपल्या कल्पना आपणांपासून त्यांच्या असणा-या अंतरावर अवलंबून असतात व त्या अंतराप्रमाणे बदलतात. उदा. दुरुन डोंगर लहान दिसतात पण पायथ्यापासून त्यांच्याकडे पाहिल्यास तेच डोंगर खूप उंच दिसतात. आकृतींची परिमाणे व आकार हे आपण त्यांच्याकडे ज्या कोनावरुन व ज्या अंतराहून पाहातो त्याप्रमाणे लहानमोठे व वेगवेगळे दिसतात.

विस्तार, आकृती , गती हे गुणधर्म मनाच्या बाहेर भौतिक वस्तूमध्ये असतात आणि त्यांच्या ठिकाणी कोणतीही जाणीव नसते, असे समजणे चूक आहे कारण वस्तूंना असणारा विचार, गती व गुणधर्म हेही त्यांच्याकडे पाहणा-या व्यक्तीच्या भूमिकेप्रमाणे, दृष्टिकोनाप्रमाणे व वस्तूपासून त्यांच्या असणा-या अंतरानुसार लहानमोठे, कमीजास्त, उंच ठेंगणे असे वाटत असतात. म्हणजे दुय्यम गुणधर्म जसे परिवर्तनीय व ज्ञातृसापेक्ष असतात तसेच वस्तुगत समजले जाणारे प्राथमिक गुणधर्महीं इंद्रियानुभवाप्रमाणे बदलत असतात.ते ज्ञानेंद्रियांवर अवलंबून राहातात, ज्ञात्यांच्या परिस्थितीप्रमाणे, भूमिकेप्रमाणे आणि दृष्टिकोनाप्रमाणे बदलतात.

म्हणून बर्क्लेच्या मते जो न्याय आपण दुय्यम गुणधर्मांना लावतो तोच न्याय प्राथमिक गुणधर्मानाही लागू करता येतो व तो लागू केल्यास जे दोष व ज्या उणीवा दुय्यम गुणधर्मांच्या ठिकाणी दिसून येतात तीच प्राथमिक गुणधर्मांच्या ठिकाणी असतात असे दिसून येते असे बर्क्ले म्हणतो.

## संबंध अवियोज्य / वेगळे करता न येणारे संबंध

बर्क्लेच्या मते दुय्यम व प्राथमिक गुणधर्म हे एकमेकांपासून अलग करता येत नाहीत. त्यांचा *संबंध अवियोज्य* असतो. रंग, रुची व स्पर्श हे गुणधर्म विस्तार, आकृती किंवा गती यांच्याशी कोणताही संबंध नसता स्वतंत्रपणे असू शकत नाहीत. नुसता रंग किंवा नुसती रुची किंवा नुसता गंध किंवा नुसता ध्वनी असू शकत नाही. रंगसाठी आपणांस नेहमी रंगीत वस्तू किंवा रुचीसाठी रुचकर पदार्थ असावा लागतो. आपणांस सुटा रंग पाहावयास मिळत नाही. तर कोणत्या तरी रंगाची रंगीत वस्तू पाहावयास मिळत असते. नुसता सुटा हिरवा रंग पाहावयास न मिळात हिरवे पान, हिरवे गवत, हिरवा पोपट अशी कोणती तरी मूर्त पाहावयास मिळते व तिच्या साहाय्याने व अनुरोधाने हिरवा रंग पाहावयास मिळतो. तसेच रुची, ध्वनी, गंध इत्यादी गुणांचे असते. म्हणजे दुय्यम गुणांचे वेदन होण्यासाठी त्यांना प्राथमिक गुणांचा आधार लागतो. रंग अमूर्त स्वरुपात पाहावयास न मिळता 'रंगयुक्त विस्तार' आपणांस पाहावयास मिळत असतो.

जसे दुय्यम गुण प्राथमिक गुणांपासून वियुक्त किंवा अलग अनुभवयाला मिळत नाहीत तसे विस्तार, आकृती व गतीसारखे प्राथमिक गुणधर्मही दुय्यम गुणधर्मांशिवाय अनुभवायाला मिळत नाहीत तसे विस्तार अमूर्त

आकृती किंवा अमूर्त गती यांची कल्पनाही करवत नाही. विस्तार, आकृती व गती हे प्राथमिक गुणधर्म कोणत्या तरी मूर्त व विशिष्ट संवेदनीय रुपात अनुभवायला मिळत असतात. म्हणून बर्क्ले म्हणतो की दुय्यम गुणधर्म आपल्या मनात वसत असतात आणि प्राथमिक गुणधर्म वस्तूमध्ये असतात असा फरक करणे चुकीचे ठरते.दुय्यम गुणधर्म जसे मनावर अवलंबून असतात व मनात बसत असतात त्याच अर्थाने प्राथमिक गुणधर्मही मनावर, ज्ञात्याच्या दृष्टिकोनावर, भूमिकेवर व अंतरावर अवलंबून असतात व तेही त्याच्या मनावर अवलंबून असल्याने ज्ञात्याच्या मनात असतात असेच समजावयास पाहिजे. दुय्यम गुणधर्माप्रमाणे प्राथमिक गुणधर्मही **'ज्ञातृसापेक्ष'** असतात असे बर्क्लेचे मत आहे.

## भौतिक द्रव्य

दुय्यम व प्राथमिक गुणधर्म हे स्वावलंबी व स्वयंपूर्ण नसतात. त्यांना धारण करण्यासाठी एखादी आधारभूमी किंवा अधिष्ठान (Substratum) लागते, व त्यांना धारण करणारे द्रव्य भौतिक द्रव्य (Material Substance) असते असे लॉक म्हणतो. हे भौतिक द्रव्य माणसाच्या ज्ञानेंद्रियावर व मनावर संस्कार घडवीत असते व संवेदनीय गुणांच्या मार्फत लोकांना दिसते, भासते व प्रतीत होते. त्याचे वरचे भासमान वसंवेद्य रुप फक्त आपणास दिसते व कळते व त्याचे अंतरंग काय असते ? याविषयी आपणांस कल्पना करता येत नाही, कारण कोणतेही वेदन किंवा संवेदन त्याचे आपल्या शक्तीप्रमाणे ग्रहण करु शकत नाही. म्हणून त्याची आपणांस कल्पनाही करता येत नाही, तरीही आपल्या वेदनाचे कारण म्हणून त्याला अस्तित्व असते. गुणधर्माचा आधार, अधिष्ठान व कारण म्हणून ते असते, मात्र ते 'अज्ञात व अज्ञेय' असते, असे लॉकचे जे म्हणणे आहे हे बर्क्लेला मान्य नाही.

लॉकची अज्ञात अधिष्ठानाची (द्रव्याची) कल्पना बर्क्ले अधिक कसोशीने व चिकित्सकपणे तपासून पाहातो.अशी अज्ञात द्रव्याची कल्पना अर्थशून्य असते व तिला वास्तवात अस्तित्व असते असे दाखवितो, व मूर्त भौतिक द्रव्याला अस्तित्व नसते, ते कल्पनानिर्मित व कलोलकल्पित असते असे मत मांडतो. बर्क्ले म्हणतो की असे भौतिक द्रव्य कार्य करीत नाही, त्याला संवेदन होत नाही व त्याचेही संवेदन कोणाला होत नाही, जे जड, इंद्रियविहीन किंवा अज्ञात द्रव्य असते.

*''ज्यांचे आपल्या ज्ञानेंद्रियांना वेदन होत नाही. किंवा जे चिंतनाने समजत नाही, किंवा जे आपल्या मनात कल्पना निर्माण करावयास अक्षम असते, ज्याला विस्तार व कोणात्याही विशिष्ट ठिकाणी नसते, म्हणजे जे कोणत्याही रीतीने आपल्या अनुभवात येऊ शकत नाही त्याचे मला ज्ञान कसे होऊ शकेल ?''* असा प्रश्न बर्क्ले विचारतो. तो म्हणतो की भौतिक द्रव्य हे शब्द उच्चारल्याने माझ्या मनावर कोणताही संस्कार उत्पन्न होत नाही आणि केवळ माणसाच्या मनातील दीर्घकालीन दूषितग्रहाने व गैरसमजाने बुध्दीला पटणारा कोणताही पुरावा उपलब्ध नसताना त्याच्या मनात विचारहीन अशा 'कशाच्या तरी कल्पनेस (Thoughtless Somewhat)' आपले मन मूर्खपणाने व हौसेने चिकटून राहिलेले आहे. अशा रीतीने मनाबाहेर जड भौतिक द्रव्य असते या कल्पनेस व विश्वासास बर्क्ले विचारहीनतेचे व मूर्खपणाचे लक्षण समजतो.

बर्क्लेच्या मते जड भौतिक द्रव्य अकल्पनीय असते. एवढेच नव्हे, तर अस्तित्वात असले तर त्याचा आपणांस काही उपयोगही होणार नाही.यापुढे जाऊन बर्क्ले म्हणतो की जरी आपण भौतिकवाद्यांना पाहिजे असलेल्या बाह्य वस्तू दिल्या तरी त्या वस्तू कल्पना कशा निर्माण करतात हे त्यांना समजू शकत नाही. जड द्रव्य किंवा वस्तू मनावर किंवा आत्म्यावर कोणत्या रितीने परिणाम घडवू शकते हे समजण्यास आपण असमर्थ असतो असे ते स्वत:च कबूल करतात. म्हणून आपल्या मनात कल्पनांची व वेदनांची निर्मिती करण्यासाठी बाह्य जगात जड भौतिक द्रव्य अस्तित्वात असते असे समजणे आवश्यक असते असे समजण्यास कोणतेही कारण व पुरावा सापडत नाही.

आपल्या मनातील कल्पना व संवेदने यांची निर्मिती होण्यासाठी बाह्य जगात जड भौतिक द्रव्य अस्तित्वात असले तरी त्यांचे ज्ञान आपणांस होणे कधीही शक्य होणार नाही. अशा रीतीने कोणत्याही रीतीने विचार केला तरी ज्ञात्याच्या मनाबाहेर बाह्य जगात वस्तू व जड भौतिक द्रव्य ही असतात असे सिध्द व प्रस्थापित करण्यास आधार व बुध्दिनिष्ठ पुरावा व कारण सापडत नाही असे बर्क्लेचे म्हणणे आहे.

## अहंमात्रवाद (Solipsism) नाही

बर्क्लेच्या या उपपत्तीनुसार जितके पाहणारे ज्ञाते असतील तितकी त्यांची प्रत्येकाची स्वतंत्र जगे असतील; परिणामी सर्वांना सामायिक असे सार्वजनिक जगत मात्र अस्तित्वात नसते,असा अर्थ ध्वनित होतो. पण बर्क्लेची अशा तऱ्हेची अहंमात्रवादाची (Solipsism) भूमिका नाही हे लक्षात घ्यावयास पाहिजे. बर्क्ले अहंमात्रवादी नाही असे म्हणणे म्हणजे त्याच्या भूमिकेपासून अहंमात्रवाद निष्पन्न होत नाही, असे सांगणे होय.बर्क्लेचा मनाच्या व आत्म्याच्या अनेकत्वावर विश्वास होता. तथापि त्याच्या उपपत्तीनुसार निसर्गात सत्य वस्तू (Rerum natura) असतात आणि संवेद्य वस्तूंचे रुपांतर केवळ कपोलकल्पित व काल्पनिक गोष्टीत तो करीत नाही याची ग्वाही कशी देता येईल ?

बर्क्ले ज्यांना कल्पना म्हणतो त्या वस्तूंच्या कल्पना नसून त्या स्वत:च वस्तू आहेत. बर्क्लेच्या कल्पना स्वत:च्या पलीकडे असलेल्या वस्तूंचा निर्देश करीत नाहीत. त्या स्वत:च वस्तू (Entities) आहेत असे तो मानतो. कल्पनांचे आपणांस संवेदन होते, त्यात आपण संवेद्य वस्तूंच्या प्रतिमा न पाहाता प्रत्यक्ष संवेद्य वस्तूच पाहातो बर्क्ले म्हणतो की वस्तूंना कल्पनांपासून विलग करण्यात त्याला ते सत्यच काढून घेतले जाते, कारण आपले सर्व ज्ञान आपल्या कल्पनांमध्येच मर्यादित झालेले असते.

बर्क्ले म्हणतो की ज्या कल्पना नसतात त्यांच्याशी कल्पनांचा संबंध जोडण्यात आपण *'च्या कल्पना'* असा जो शब्दप्रयोग करतो तो आपल्या विचाराच्या चुकीचे कारण ठरते. ही गोष्ट स्पष्ट आहे की बर्क्ले ***'प्रतिरुपण उपपत्तीचा' (Representative theory)*** पुरस्कार करीत नाही. कारण त्याच्या मते प्रतिरुपण करण्यासाठी कल्पनांच्या पलीकडे काही नसतेच. बर्क्लेने लॉकपासून 'कल्पना' हा शब्द उसना घेतला खरा आणि संवेदनाचा अव्यवहित विषय म्हणून त्याने त्याचा उपयोग केल. परंतु 'कल्पना' हा शब्द लॉकच्या तत्वज्ञानात जे कार्य करतो तेच कार्य बर्क्लेच्या तत्वज्ञानात करीत नाही. कारण लॉकच्या तत्वज्ञानात 'कल्पना' भौतिक वस्तू व जाणणारे मन यांच्या दरम्यान 'मध्यस्ती' करीत असतात, बर्क्लेच्या मते मात्र 'कल्पना' मध्यस्थांचे कार्य न करता त्या स्वत:च संवेद्य ज्ञानविषय असतात.

लॉकच्या विचारातील या दोषांमागे एक कारण आहे. ते असे की बर्क्लेच्या मते लॉकला अमूर्त कल्पनांचे भ्रामक रुप समजू शकले नाही. बर्क्लेच्या मते अमूर्त कल्पना (Abstract idea) ही केवळ मनाने घडविलेली असते व म्हणून ती काल्पनिक आणि अवास्तव स्वरुपाची असते. म्हणून ती विचारात घातक गोंधळ करण्यास जबाबदार ठरते. अमूर्त कल्पना ज्या वस्तूंशी अवियोज्य रीतीने बध्द असते तिच्यापासून ती बौध्दिक वियोजनाच्या मार्गे (Abstruction) अलग करण्यात येते. लॉकने गुणधर्मांना धारण करणारे 'अधिष्ठान' (Substratum) गुणधर्मांपासून भिन्न काहीतरी असते असे अमूर्त कल्पनेच्या साहाय्याने समजण्यात निराधारपणे व असमर्थनीय रीतीने समण्यात मोठीच चूक केली आहे, अशी बर्क्लेची टीका आहे.

बर्क्लेच्या मते ज्या गुणधर्मांच्या समुच्चयाने आपल्या मनातील कल्पना तयार होतात त्यांच्यापासून ज्ञानविषय (वस्तू) वेगळी व विविक्त असते असे जर म्हटले नसते व तार्किक सुसंगती टिकविली असती तर सत्य जगाहून भासमान जग वेगळे असते असे समजण्याची शोकजनक चूक लॉककडून झाली नसती. ह्यूमच्या दृष्टीने अमूर्त कल्पनांविषयीचा बर्क्लेचा शोध हा अलीकडील काळात सर्वात महत्वाचा समजावयास पाहिजे.

अमूर्त कल्पनेविषयी वेगळा दृष्टिकोन स्वीकारण्यात बर्क्ले लॉकपासून आपली भिन्न भूमिका व्यक्त करतो हा पहिला महत्वाचा मुददा समजावयास पाहिजे. त्याचप्रमाणे प्राथमिक व दुय्यम गुणधर्मात समजला जाणारा भेद बर्क्ले काढून टाकतो व जे जे दुय्यम गुणधर्मांच्या बाबतीत सत्य असते ते प्राथमिक गुणधर्माच्याही बाबतीत सत्य असते असे म्हणतो. त्या दोघांमध्ये भेद करणारी स्पष्ट रेषा काढणे शक्त होत नाही, आणि या चुकीचाही अमूर्त कल्पना जबाबदार असते असे त्याचे म्हणणे आहे. त्याच्या मते रंग जितका व्यक्तिसापेक्ष असतो तितकेच विस्ताराचे संवेदन व्यक्तिसापेक्ष असते. रंगविरहित विस्तार असणे ही एक शुध्द अमूर्त कल्पना होय, आणि ती आपल्या अनुभवात आपल्या मानसिक क्रियेचे जिच्याशी अनुसंधान नसते अशी केवळ मनोनिर्मित व काल्पनिक स्वरुपाची असते.


---

## ह्यूमचा संशयवाद

ब्रिटीश अनुभववादातील शेवटचा तत्वज्ञ म्हणजे डेविड ह्युम होय.लॉकने सुरु केलेला अनुभववाद अधिक सुसंगत रितीने व कोणतीही तडजोड न करता तर्कशुध्द पध्दतीने लॉकने ते पूढे नेले.अनुभवाला त्याने अधिकाधिक परिपक्व रुप दिले. आणि तिला बांधेसूद, तर्कशास्त्रीय स्वरुप प्राप्त करुन दिले.

26 एप्रिल 1711 ते 18 एप्रिल 1776 हा ह्यूमचा काळ होता. ब्रिटनमधील एडिंबरो येथे एका सुखवस्तू घराण्यात त्याचा जन्म झाला. त्याच्या लाहनपणीचं त्याचे वडील वारले. त्याचे बरेचसे शिक्षण त्याच्या घरी आणि एडिंबरो विद्यापीठात झाले. 1775 मध्ये वसंतऋतूत त्याला पोटाचा आजार होऊन त्याचा मृत्यू झाला.

**David Hume**
(7 May [26 April] 1711 – 25 August 1776)
Scottish philosopher, historian, economist, and essayist.
the most important figures in the history of Western philosophy
In *A Treatise of Human Nature* Hume strove to create a total naturalistic "science of man" that examined the psychological basis of human nature.



ह्यूमचे ग्रंथ :-

ह्यूमने पुढील ग्रंथ लिहीले :-

1) *Treatise on Human Nature*
2) *Essays on Moral And Political*
3) *Enquairy Concerning The Principals of Morals*
4) *Political Discoureses*
5) *Philosophical Essays Concerning Human Understanding*
6) *Suicide*
7) *The immortality of the Soual*

# ह्यूमपुढील समस्या

आपणांस आपल्या कल्पनांचे नीतीचे, ईश्वराचे निश्चित ज्ञान होत नसते. त्याचप्रमाणे बाहय जगातील वस्तूंचेही ज्ञान होते, असे लॉकने सांगितले. दुसरा अनुभववादी बर्क्ले भौतिक जगाचे ज्ञान नाकरतो. आणि अस्तित्वात असणे म्हणजे अनुभव येणे असे मत मांडतो. लॉक आणि बर्क्ले या दोघांचे हे अनुभवाचे तत्वज्ञान हृयुम स्विकारतो. आणि एक वेगळया प्रकारचा संशयवाद मांडतो. त्याच्या मते, आपणास जेवढा अनुभव येतो, तेवढेचं ज्ञान होते. अनुभवाच्या कक्षेबाहेरचे ज्ञान आपणास होऊ शकत नाही आणि शिवाय अनुभवाच्या क्षेत्रातसुध्दा निश्चित ज्ञान न मिळता संभाव्यज्ञान मिळते असे मत मांडते. निश्चित ज्ञान मिळाले तर ते फक्त गणितात मिळू शकते, असे तो सांगतो.

थोडक्यात ह्यूमच्या मते मानवी ज्ञान जगातील फकत संवेद्य घटनांपुरतेच असते. त्या पलीकडे जे काही आहे,ते सर्व अज्ञेय:- उदा. द्रव्य, कार्यकारण संबंध, आत्मा, ईश्वर, जग, अंतीम सत्य इ. ह्यूमच्या अनुभववादातून त्याचा संशयवाद सिध्द होतो.

ह्यूमपुढील तात्विक प्रश्न म्हणजे ज्ञानाचे स्वरुप कसे असते? ज्ञानाची निर्मिती कशी होते ? आणि त्याला किती प्रमाणात निश्चिती असते ? त्याच्या मर्यादा कोणत्या असतात ? ज्ञानाचा अर्थ काय ? इ. ह्यूमपुढील मुख्य ज्ञान विषयक समस्या म्हणजे **ज्ञानाचा उगम कसा होतो ?** याविषयीचा त्याच्या सिध्दांत पुढीलप्रमाणे.

## ह्यूमचा ज्ञानसिध्दांत

### ह्यूमचा कल्पना साहचर्याचा सिध्दांत

### (घटनातथ्ये आणि कल्पना यांत ह्यूमने केलेला फरक)

हृयुमची ज्ञानविषयक कल्पना लॉक किंवा बर्क्लेच्या सिध्दांताप्रमाणेच आहे. आपल्या ज्ञानाचा उगम इंद्रिय संवेदनातून होतो, असे बर्क्ले म्हणतो. त्याचाच विस्तार हृयुम करतो.

### ठसे आणि कल्पना (Impressions and idea)

मानवी मनाला मुख्यत: संवेदनांमार्फत ज्ञान मिळते. या संवेदनांचे दोन प्रकार पडतात.त्यांना ह्यूम ठसे आणि कल्पना असे म्हणतात.(Impressions and idea) ह्यूमच्या मते आपणांस लाभणाऱ्या विविध प्रकारच्या अनुभव म्हणजेच संवेदना होय. ठसे आणि कल्पना हे या संवेदनांचे उपप्रकार आहेत.

आता कोणती संवदेना ठसा आहे व कोणती संवदेना कल्पना आहे हा फरक त्या संवेदनांच्या तीव्रतेवर आणि आवेगावर ठरतो. ज्या संवेदना आपल्या जाणिवेत खूप वेगाने आणि जोरदारपणे शिरतात.त्यांना *ठसे* असे म्हटले आहे.या ठसांच्या साह्याने ज्या प्रतिमा तयार हातात त्यांना *कल्पना* म्हणतात. उदा.:- एखाद्या व्यक्तीचे बोलणे ऐकणे, स्पर्श अनुभवने, वस्तूची चव चाखणे, उष्णता, थंडी, यांच्या संवेदना घेणे, हे *ठसे* आहेत.या ऐकण्यातून, स्पर्शाच्या अनुभवातून त्या व्यक्तीविषयी जी प्रतिमा तयार होते, विचार मनात येतो किंवा उष्णता, थंडीची प्रतिमा तयार होते तेव्हा तिला ***कल्पना*** म्हणतात

अशा रितीने, इंद्रिय संवेदना आणि मानसिक संवेदना यांच्यामार्फत आपल्या मनावर प्रथम काहीक ठसे उमटवतात. नंतर त्याचे रुपांतर विचारात होते. त्या प्रतिमा असतात. अशा सर्व ठसांपासून आपले सर्व ज्ञान तयार होत असते.याचा अर्थ असा की, आपल्या सर्व कल्पना व विचार यांची निर्मिती संस्काररुपी ठसांपासून होत असते. ज्या गोष्टीचा ठसा मनावर उमटत नाही. त्याची कल्पना असूचं शकत नाही. म्हणजेचं ज्याची कल्पना होऊ शकते. त्यांचे ठसे निश्चितच असतात. त्यांच्यापासून बनलेल्या कल्पनांची इमारत तयार होते आणि आपला विचार अस्तित्वात येतो. ह्युम कल्पनांचे दोन प्रकार करतो त्या अशा :-

## 1) निरवयव कल्पना :-
## 2) संमिश्र कल्पना :-

- *निरवयव / सरल कल्पना म्हणजे मनावर उमटलेल्या ठसांप्रमाणे निर्माण झालेली प्रतिमा.*
- *संमिश्र कल्पना म्हणजे या निरवयव कल्पनांच्या संमिश्रातून आलेली कल्पना.*

ही लॉकचीचं कल्पना ह्युम स्विकारतो. पण त्यात तो बदल करतो, तो असा :-

ह्युमच्या मते, ज्यापासून आपला विचार तयार होतो आपले ज्ञान तयार होते त्या केवळ सरल कल्पनांचाच असतात.कारण ठसे हे केवळ सरल कल्पनांचेच असतात.संमिश्र कल्पनांचे ठसे कधीही नसतात. ठसे साधे असतात आणि कल्पनाही साध्या असतात. पण त्यांची मिसळण झाली की, संमिश्र कल्पना तयार होतात. पण तिचा कधीही ठसा असू शकत नाही. उदा. मी अशी कल्पना करु शकतो की, मुंबई हे शहर आहे की ज्याचे रस्ते सोन्याने तयार केलेले आहेत,तेथील माणसे हिऱ्या माणकांच्या भिंती असलेल्या घरात राहत आहे. इ. उघडचं अशा मुंबईचा ठसा असू शकत नाही.केवळ मुंबई, रस्ते, भिंती, तसेच सोने, हिरे, यांच्या स्वतंत्र कल्पना असतात. आणि स्वतंत्र ठसेही असतात. पण त्यांचे संमिश्रण असलेल्या कल्पनांचे ठसे असतात.

थोडक्यात, ज्यांचे ठसे असतात, त्या साध्या कल्पना असतात व संमिश्र कल्पनांची निर्मिती साध्या कल्पनांपासून होते पणा त्यांचे ठसे नसतात मात्र साध्या कल्पनांची जुळणी करुन विविध प्रकारची संमिश्र कल्पना तयार करता येतात. आपले मन आणि संकल्प शक्ती ठसांची अनेक प्रकारे जुळणी करुन गुंतागुंतीच्या कल्पना तयार करते.

ह्युमच्या या प्रतिपादनाच्या अर्थ असा की, जिचा कोणताही ठसा किंवा संस्कार कधीही अनुभवलेला नसतो त्याची कल्पना तयार करता येत नाही आणि साहजिकच अशा कल्पनांपासून समिश्र कल्पनाही तयार करता येत नाही. ह्युमच्या मते आधी आपल्या जाणिवेत ठसे येतात नंतर त्यांच्या प्रतिमा बनतात व मग ज्ञानाची रचना होते. म्हणजेच ***जेथे ठसा नाही तेथे कल्पना नाही.***

ह्युमच्या मते आपल्या वेदनांचे, संवेदनांचे व चिंतनाचे ठसे असतात. जर कोणी संमिश्र कल्पना मांडली तर तिची सरल कल्पनांमध्ये विभागणी करता येते. आणि तिचे विश्लेषण करता येते व त्या विश्लेषाणातून ज्ञानाचे सुस्पष्टीकरण मिळू शकते.उदा.एखाद्या खेडयातील मुलाला शहरातील गगनचुंबी इमारतीची कल्पना दयावयाची असेल तर तिचे वर्णन करण्यापेक्षा त्या मुलाला थेट ती इमारत दाखविणे. त्यानंतर त्याच्या मनावर तिचा प्रत्यक्ष ठसा उमटविणे व त्याला इमारतीची कल्पना करता येते.

ह्युमचा हा ज्ञानविषयक सिध्दांत देकार्तच्या उपजत कल्पनासिध्दांताच्या विरोधात आहे. देकार्तच्या मते, कार्यकारण संबंध, द्रव्य, ईश्वर इ. कल्पना आपल्या मनात मूळातच असतात. पण ह्युमच्या मते कोणतीही कल्पना बालकाच्या जन्मापासून कधीही नसते.ती संस्कारानेच निर्माण होते. ज्ञानासाठी केवळ संस्काराची, ठशांची गरज असते.

## कल्पना शक्तीचा उगम

आपणांस एकदा मिळालेले ठसे पुन्हा-पुन्हा मनासमोर आणता येतात. हे काम जी मनशक्ती करते तिला ह्युम *स्मरणशक्ती* म्हणतो.ही स्मरणशक्तीचं कल्पना शक्तीच्या रुपात परिवर्तीत होते.अर्थात, त्यांच्यातही सूक्ष्म फरक आहे. आधी स्मरण शक्ती व नंतर कल्पनाशक्ती असा क्रम येतो.

स्मरणशक्तीत मुळ निरवय व कल्पना टिकवून ठेवल्या जातात. त्यांचा कम व स्थिती सुरक्षित ठेवला जातो.त्या जशा घडल्या आहेत तशाचं मनासमोर आणल्या जातात घटनांचे कम व त्यांच्यातील संबंध तसाच टिकविला जातो. उदा. खेळाचे सामने, नाटक यात जशा घटना घटतात त्याच कमाने आठव्यावा लागतात.उलट

कल्पनाशक्तीत मात्र घटनांचा कम व स्थिती यांच्यात कायम उलटा-पालट होते. निरवयाची कशीही गुंफण होते. कोणतीही कल्पना होते. एका अर्थाने येथे स्वैराचार असतो. नाटक, साहित्य, काव्य, कादंब-या या सर्वामध्ये ही कल्पनाशक्ती आढळते.

आपले जीवन अशा विविध कल्पनांचा व्यवहार असते. आपल्या मनात काही बाहय आणि काही अंतरिक ठसे प्रवेश करतात. मनात ठसे व कल्पना याशिवाय काहीही नसते. येथे एक प्रश्न उपस्थित होतो. तो असा की, जर मनात ठसे व कल्पना या व्यतिरिक्त काहीही नसेल तर आपणांस भ्रम ज्ञान कसे होते ? यावर ह्युमचे उत्तर असे की, स्मरणशक्ती, कल्पनाशक्ती, आकलनशक्ती या सगळयांची सतत चवळावळ करते. विविध आकल्पित रचना करते आणि मगं भ्रम ज्ञान तयार होते.

या कल्पना विविध प्रकारच्या साहचार्य भावाने जोडल्या जातात आणि एक वेगळेचं विचारविश्व आपल्या समोर येते. या कल्पनांचे साहचार्य पुढीलप्रकारे घडते :

## ह्यूमचा कल्पना साहचर्याचा सिध्दांत

आपल्या मनात असणारे ठसे आणि कल्पना यांच्याबरोबरच मनाच्या ठिकाणी काही इतरही मानसिक शक्ती असतात.त्यामुळेच स्मरणशक्ती, कल्पनाशक्ती, आकलनशक्ती आणि संकल्पशक्ती या शक्तीच्या साह्याने मन कल्पनांची अदला बदल करणे, त्यांचे प्रमाणेच कमी-जास्त करणे, त्यांची विविधप्रकारे मिसळण करणे ही कार्ये करते.ही करतांना कल्पना काही विशिष्ट प्रकारच्या साहचार्याने बनलेल्या असतात.आपले सगळे मानसिक जीवन आणि आपल्या मनस् शक्ती या कल्पनांच्या साहचार्यानेचं बनतात. या साहचर्यसंबंधामध्ये काहीही गूढ, रहस्यमय, गहन असे काहीही नसते.या सगळ्या क्रिया विशिष्ट यांत्रिक व स्थिर नियमानुसार होत असतात. जेस संवेदनांचे आघात होतात तसे ठसे अमटतात आणि कल्पनाही एकमेकांशी सहजपणे संबंधित येतात.

## कल्पना करण्याच्या पध्दती : कल्पना साहचर्याचे नियम

साहचर्यापासून कल्पनांचे गट तयार होतात.त्यांना तो *विचारमालिका* म्हणतो. या कल्पना स्वत:हून गटरुपात येतात. कारण त्याचे येणे हा त्यांचा स्वभाव असतो. त्यांना एकत्र आणणारी एक शक्ती असते, तिला तो *सौम्यशक्ती* म्हणतो. कल्पनांच्या या साहचर्य संबंधाचे वर्णन ह्युम *कल्पना करण्याच्या पध्दती* अशा शब्दांत करतो. या पध्दती त्याच्या मते तीन आहेत. त्यांना तो *कल्पना साहचर्याचे नियम* असे म्हणतो. ते पुढीलप्रमाणे

### *1) सादृश्याचा किंवा विरोधाचा नियम :-*

ज्यांच्या गुणधर्मांमध्ये सारखेपणा किंवा विरोध असतो अशा कल्पना एकत्र येणे, म्हणजे सादृश्याचा नियम होय. उदा.गणितातील संख्येच्या कल्पना, किंवा भूमितीतील आकृत्यांच्या कल्पना, स्त्री-पुरुषांच्या कल्पना, विविध प्रकारचे अन्न व पेये. या कल्पना मध्ये मनाचा कल असा असतो की, ते समान गुणधर्माच्या गोष्टीना एकत्र आणते. दोन गोष्टीतील पूर्णविरोधी कल्पनांना एकत्र आणणे.जसे सोने व रस्ता यातून सोन्याचा रस्ता किंवा उडणारा घोडा.

### *2) दिशा व कालातील सानित्याचा नियम :-*

ज्या गोष्टी किंवा घटना स्थल आणि काल यांच्यादृष्टीने शेजारी किंवा निकट असतात. त्यांचे ठसे आणि प्रतीमा व कल्पना यांचे आपल्या स्मरणात साहचर्य असते. म्हणजे एक आठवली की दूसरी आढवते. जर तिच्याबरोबर तिसरी असेल तर तीही आठवते. एखादा विशिष्टय चेहरा पाहिला की त्या व्यक्तीचे नाव व तिच्याशी संबंधित घटना आठवते. याचे कारण त्यांच्यात एकच स्थल आणि एकचं काल असतो. म्हणजे त्यांचे संवेदन होताना ठसे ज्या कमाने उमटतात.त्याच क्रमाने कल्पना तयार होतात.स्थिर होतात.आठवतात.

हा नियम साधारणत: विज्ञानामध्ये उपयोगी पडतो. विज्ञानाची रचना या नियमाच्या आधारे होते.

### *3) कार्यकारण भावाचा नियम :-*

ह्युमच्या मते, प्रत्येक घटनेस कारण असते. कारणाशिवाय कार्य घडतच नाही. प्रत्येक घटना तिच्या निर्मितीसाठी तिच्या पूर्वी घडलेल्या पहिल्या घटनेवर अवलंबून असतो. ती तिचे कारण असते. हा कार्यकारण भावाचा नियम होय.

## ह्यूमची कार्यकारणाची संकल्पना

ह्युमची कार्यकारणाची संकल्पना त्याच्या ठसे व प्रतीमा यांनी निर्माण होणा-या कल्पनांच्या साहचार्याच्या नियमातून निष्पन्न होते.त्याच्या मते कार्यकारण संबंध हा अनिवार्य पणे निष्पादित होणारा नाही. हा कल्पनांच्या साहचार्याचा नियम आहे आणि तो सर्व प्रकारच्या सामाजिक व नैसर्गिक विज्ञानाला उपयोगी पडणारा आहे. *''प्रत्येक घटनेला कारण असतेच व कारणाशिवाय कार्य निर्माण होऊ शकत नाही.''* हे कार्यकारण भावाचे गृहित तत्व आहे. कारण कल्पनेचा सखोल व मुलभुत विचार करण्यात ॲरिस्टॉटल नंतर ह्युमचाच कमांक आहे. आपल्या सर्वप्रकारच्या ज्ञानात कारणकल्पना अतिशय महत्वाची आहे, हे ॲरिस्टॉटल नंतर त्यानेच ओळखले.

पण ह्युमने दिलेले कारण कल्पनेचे विश्लेषण अतिशय मूलभूत आणि धक्कादायक आहे. कारणाच्या गृहिततेवर त्याने व्यक्त केलेला संशय इतका महत्वाचा व प्रभावी ठरला की, कान्टला कारण कल्पनेची युक्तता सिध्द करण्यसाठी एक स्वतंत्र ज्ञानशास्त्रीय सिध्दांत मांडावा लागला.

कार्यकारण संबंधाचे ज्ञान आपणास कसे प्राप्त होते ? हा मुलभूत प्रश्न आहे. आपणास ते अनुभवातून प्राप्त होते की, अनुभवपूर्व रितीने म्हणजे अंतप्रज्ञेने प्राप्त होते की एक समस्या आहे. त्याचप्रमाणे कारण व कार्य यांच्यात नेमका काय संबंध आहे ? कारणात कार्य घडविण्याची शक्ती खरोखरचं असते का ? तशी आपली श्रध्दा असते ? असे प्रश्न ह्युम उपस्थित करतो. आणि गेल्या 300 वर्षामध्ये या प्रश्नांची उत्तरे समाधानकारकरित्या आजही कुणीही दिलेली नाही.

## निरीक्षण आणि अनुभव

ह्युमच्या मते कार्यकारण संबंधाचे ज्ञान आपणास निरीक्षण आणि अनुभव यांच्याच मार्फत होते. आणि मुख्यत: ते कल्पना साहचर्याच्या पध्दतीनेच होते. ते कोणत्याही अंतरज्ञानाने होत नाही. उदा. :- एका वस्तूमागे दूसरी वस्तू जाते, एकीनंतर दूसरी घटना घडते आणि त्यांची सवय होते. जसे मशाल पेडवीली की, उष्णता निर्माण होते.बर्फामुळे थंडावा येतो, अशाप्रकारे कोणत्याही दोन प्रकारच्या वस्तू किंवा घटना सतत एकमेकीबरोबर येतात व जातात.त्यामुळे पहिली दूसरीची कारण असावे, असे आपणास वाटू लागते. म्हणजे पहिली घटना पाहिली की दूसरी घडावी अशी अपेक्षा मनात निर्माण होते, त्यांची सवय होते आणि मग त्या दोघामधील साहचर्य दैंनदिन तसेच टिकेल अशी श्रदधा तयार होते. एवढेच !

## *मानसशास्त्रीय स्पष्टीकरण*

आपल्याला कार्यकारण म्हणून जे काही आहे , असे वाटते ते म्हणजे केवळ मानसिक श्रदधा असतात. ह्युमच्या मते, या श्रदधेचे विश्लेषण केले असता आपणांस असे दिसेल की त्या दोन घटनांमध्ये केवळ एकानंतर दूसरी एवढाच क्रमभाव असतो.एकानंतर दूसरी घटना घडताना सतत पाहिल्यानंतर त्या तशाच घडाव्यात अशी केवळ मनाला सवय लागते. पण ह्युमच्या मते ही सवय आपणांस भविष्यकालीन घटनांची निश्‍चिती देऊ शकत नाही. उदा. गेली लाखो वर्षे रोज सूर्य उगवतो म्हणून तो उद्या उगवेल असे आपणांस वाटत असते.गेली करोडो वर्षे सूर्य उगवला म्हणून उद्या उगवणारच असे म्हणण्याला कोणताही सबळ आधार नाही.

ह्युमची कारण कल्पतेची विश्लेषणाचीही पदध्त मानसशास्त्रीय आहे.म्हणजे तो कार्यकारण संबंधाचे मानसिक स्पष्टीकरण देतो, तात्विक नाही. या संबंधाचे तो तीन घटकांत विभाजन करतो, ते म्हणजे :-

1) घटनांचे सानिध्य
2) घटनांचा क्रमभाव
3) घटनांमधील अनिवार्य संबंधाची कल्पना

जे आपल्या संस्कारात किंवा ठसे व प्रतीमा यांच्यात आपणांस घटनांचे सानिध्य व त्यांच्यातील कमभाव एवढांच अनुभवास येतो. पण त्यामुळे त्यांच्यात अनिवार्य संबंध असावा, असे उगाचच वाटू लागते. आपली आकलनशक्ती, कल्पनाशक्ती, आणि संकल्पशक्ती या संबंधाची धारणा करते, एवढेच.ज्या तर्कशास्त्रीय पध्दतीने कार्यकारणात संबंध असला पाहिजे, तसा संबंध कार्यकारणात नसतो, असे सांगून ह्युम मानसशास्त्रीय स्पष्टीकरणानंतर तर्कशास्त्रीय स्पष्टीकरणही देतो.

## *तर्कशास्त्रीय स्पष्टीकरण*

कार्यकारणात कारण घटना आणि कार्य असे दोन घटना असतात. कारण घटना ही कार्यघटनेच्या नेहमी नेहमी आधी घडणारी असते आणि ती कार्याच्या नेहमी सानीध्यात असते.कार्य-घटना कायम कारण घटनेच्या नंतरच घडते.

थोडक्यात, **कारण हे कार्याच्या नेहमी *पूर्ववर्ती व सानिध्य* असते.** आणि कार्यघटना नेहमी उत्तरवर्ती व उत्तर क्रमातच घडते. ही कार्यकारणाची तर्कशास्त्रीय कल्पना आहे.

पण ह्युमच्या मते, ही सुध्दा केवळ कल्पनाच आहे ! वास्तव नाही. कारण आपली कल्पना शक्ती किंवा संकल्पशक्ती तशी कल्पना करते आणि तसे असावे अशी अपेक्षा व संकल्प करते.कारण व कार्यात कधीही तार्कीक, अनिवार्यता व क्रमभाव नसतो.असतो तो केवळ मानसशास्त्रीय अनिवार्यता व क्रमभाव ही मानसशास्त्रीय प्रक्रीया वैज्ञानिक, तत्वज्ञ, जनसामान्य लोक, बालके आणि जनावरे यांच्यातही असते.

अर्थात ह्युम व्यवहारातील व विज्ञानातील कार्यकारण कल्पना व तिचे महत्व नाकारीत नाही.वैज्ञानिक व सर्वसामान्य लोकांनी कारण कल्पनांच्या गुंतागुंतीत पडू सुध्दा नाही. या कल्पनेचा तत्वज्ञानात्मक विचार केला तर कार्यकारणात कसलाही संबंध नाही, हे लक्षात येते.

ह्युमपुढील प्रश्न जगात कार्यकारण संबंध असतात की नसतात, हा नाही ! तर ***''ज्यास कार्यकारण संबंध असतात असे जे म्हटले जाते, त्याचा नेमका अर्थ काय असतो ? ''*** हे समजावून घेण्याचा प्रश्न आहे. जगात काही अनिवार्य संबंध असतात की नाही हा खरा प्रश्न नाही तर *'अनिवार्य संबंध असतात, असे जे म्हटले जाते त्याचा नेमका खरा व युक्त अर्थ काय असतो '* हे ठरविणे ही तत्वज्ञानात्मक समस्या आहे. जसे की गेली अब्जावधी वर्षे आजपर्यंत सूर्य उगवला म्हणतो उद्या उगावणारच किंवा एकदा लग्न झाले की त्यां नवरा-बायकोत कायम साहचर्य राहील म्हणजे नेमके काय ? असते हे समजावून घेणे.

## ह्युमला संशयवादी का म्हणतात ?

संशय घेणे म्हणजे एखाद्या ज्ञेय वस्तूंसंबंधी विविध प्रकारचे प्रश्न विचारणे. जेव्हा एखाद्या ज्ञेयासंबंधी ते हे कि हे ते असे निश्‍चित करता येत नाही तेव्हा त्या अनिश्‍चित ज्ञानाच्या अवस्थेला संशय म्हणतात. असा संशय घेणारा तो तत्वज्ञानातील वाद म्हणजे संशयवाद होय.) संशंवादास इंग्रजीत Skepticism / skepticism म्हणतात. हा शब्द ग्रीक भाषेतील skeptikos या शब्दापासून तयार झाला. skeptikos म्हणजे शोध चिकित्सा असा आहे.

कोणतेही तात्विक चिकित्सा संशंयापासूनच सुरु होते विश्‍वात जे घडते त्यासंबंधी ''का ?'' असा प्रश्न विचारणे म्हणजेच संशय घेणे असते. मानवी इतिहासात हा प्रश्न मानसाला विचारता आला नसता तर विविध प्रकारच्या शास्त्रांची रचनाच झाली नसती! याचा अर्थ असा की विज्ञानातील कार्यकारण सिध्दातांची आणि

साहजिकच मनुष्यजातीच्या सारी प्रगतीच संशयावर अवलंबून आहे.संशयवाद कोणत्याही उत्तरावर संशय घेतो आणि जास्तीत जास्त ख-या उत्तराकडे आपणाला घेऊन जातो. अर्थात हा तत्वज्ञानात्मक संशय होय.

ग्रीक व भारतीय तत्वज्ञानात संशयवाद मांडण्यात आला भारतीय तत्वज्ञानातील संशयवादी म्हणजे मुख्यत: चार्वाक नंतर बौध्द व मग जैन दर्शन होय. न्यायदर्शनाने सुध्दा संशय हा एक पदार्थ मानला आहे. त्याच्या मते तर संशयाच्या गर्भातच ज्ञानाचा जन्म होतो.

पाश्चात्य तत्वज्ञानात संशयवाद सॉक्रेटिस, प्लेटो यांच्यापासून सुरु होतो. त्यांच्यांनतर 1500 वर्षांनी देकार्तने संशयाच्या तत्वज्ञानाची पध्दती म्हणूनच स्विकार केली. आणि त्यानंतर अनुभववादी ह्युमने संशयवाद मांडला.

ह्युम अनुभववादी परंपरेचे शेवटचा अभिजात तत्वज्ञ होय.ह्युमने अनुभववादातूनच संशयवाद विकसित केला. आपल्या ज्ञानइंद्रियांना व मानसइंद्रियांना प्राप्त होणारे ज्ञान हे खरोखरच सत्य असते का ? असा प्रश्न ह्युम अतिशय शास्त्रशुध्द रितीने मांडतो. मिळणारे ज्ञान हे खरोखरच कितपत निश्चित आहे आणि कितपत संभाव्य आहे याची चर्चा म्हणून ह्युम संशयवादात करतो.

मानसशास्त्रीय संशयवाद मांडून ह्युमने ज्ञानाची व ज्ञानप्रक्रियेची चिकित्सा केली आपणास प्राप्त होणारे ज्ञान अंतिम: संभाव्य असते. विशेषत: कारणकार्य संबधं हा अखेरपर्यंत संशयास्पद राहतो त्याचे निश्चित उत्तर देता येत नाही असे ह्युमचे प्रतिपादन ह्युमचा संशयवाद ज्ञानेंइद्रियांच्या व त्याचप्रमाणे विवेकबुध्दीच्या स्वरुपाची व प्राप्त बुध्दीची ज्ञानाची चर्चा करणारा आहे. त्याचा संशयवाद ज्ञानेंद्रिय व विविध प्रकारच्या मननशक्ती यांच्यापुरता आहे.माणसाने आपली ज्ञानेद्रिये व मनशक्ती लक्षात घेऊनचं विज्ञान आपणांस केवळ आपल्या इंद्रियांच्या साह्याने होते आणि त्यांची सत्यता आपल्या अनुभवापलीकडे जाऊ शकत नाही. तसेच ती तार्कीक नियमांनी प्रस्थापित करता येत नाही. हे सत्य आपण जाणले पाहिजे व मान्य केले पाहिजे असे त्याचे म्हणणे आहे.

ह्युमला संशयवादी म्हणतात, याचे कारण तो ज्याच्या सत्यतेविषयीचा दावा करण्यात येतो, अशा ज्ञानाबददलच संशय घेतो आणि आणि जास्तीत जास्त सत्याकडे घेऊन जाण्याचा प्रयत्न करतो. तो सर्वचं गोष्टींच्या सत्याविषयी संशय घेत नाही. गणितीज्ञान किंवा अंतरज्ञान हे नि:संशयी असते असे त्याला मान्य आहे. त्याचप्रमाणे कार्यकारण कल्पनाही त्याल मान्य आहे. त्याचप्रमाणे कार्यकारण कल्पनेचा अर्थ किंवा ज्ञानाच्या सत्यतेचा अर्थ निश्चित करण्यात तो संशय दाखवितो. थोडक्यात सत्याची संकल्पना आणि सत्याचे निकष याबाबतीमध्ये ह्युम संशयवादी आहे.

संशयवाद कोणतेही उत्तर स्विकारत नाही आणि कशाच्याही खात्री पटवित नाही, हे तो मान्य करतो. पण संशयानेच ज्ञानाची आणि मानव जातीची प्रगती होते हे ह्युमचा संशयवाद मान्य करतो. त्याच्या मते संशय हा तात्वीक असला पाहिजे. तो हटटाग्रही असता कामा नये. अतिशय काळजीपूर्वक हटट्ाग्रहांपासून संशय वेगळा करण्याचे काम ह्युम करतो.

## ह्यूमची आत्म्याची संकल्पना

अनुभववादी परंपरेत लॉक, बर्क्ले, ह्यूम हे तीन तत्वज्ञ आहेत. बर्क्ले हा अनूभववादी असूनही आत्म्याचे अस्तित्व स्विकारतो.आत्मा हे जाणिवेचे द्रव्य आहे असे तो म्हणतो आणि हा आत्मा सरल, निरवयव, अविभाज्य आहे असेही त्याचे म्हणणे आहे.ह्यूम आत्म्याची बर्क्लेची ही भूमिका पूर्णपणे अमान्य करतो आणि अनुभववाद हा केवळ खरा अनुभववाद आहे असे सिध्द करतो.

आत्मा माणसांत अखंडपणे असतो,भिन्न अनुभवांमध्ये त्याची एकता, अभिन्नता अबाधित राहते, हे दावे अनुभवाच्या कसोटीला उतरु शकत नाही.या दाव्याततील कोणत्याही द्रव्याचा अनुभव येऊच शकत नाही. आत्मा नावाचा ठसा आणि त्याची प्रतिमा कधीही असूच शकत नाही असे तो म्हणतो.

आत्मा ही कल्पनाही (idea) नाही आणि संकल्पनाही (Concept) नाही. तिची फार तर 'परिकल्पना' (notion) असू शकते. तिची स्पष्ट प्रतीमा असू शकत नाही. आत्म्याचे स्वतंत्र द्रव्य म्हणूनही अस्तित्व मान्य करण्यास कोणताही सबळ पुरावाव सापडत नाही. जे आत्म्याचा दावा करतात त्यांनी तिचा ठसा दाखवावा, तो ठसा इंद्रिय संवेदनांचा आहे की अंतर्गत चिंतनाचा आहे हे दाखवावा, असे आव्हान तो करतो. आत्मा नाही असे तो सिध्द करतो.

## *अनात्मवाद*

मग आत्मा हे काय प्रकरण आहे ? तर ,ज्याला तत्वज्ञ आत्मा म्हणतात ते वास्तवात *संवेदनांचा पुंजका* असतो. आत्मा ही संकल्पना मनाच्या संकल्पनेत उमटते. मन हे एकामागून एक अत्यंत जलद गतीने धावणा-या अनंत संवदेनांचे पुंजके असतात.जसे नाटकांमधील विविध पात्रे व प्रसंग यांना बांधून ठेवणारा दिग्दर्शक असतो.तसे संवदेनांना बांधणारा व त्यांच्यात साहचर्य आणणारे मन हे एक तत्व असते.पण मनात आत्मा नावाची एक स्वयंभू, नित्य अशी कोणतेही गोष्ट नसते.तेथे असतात ते केवळ संवेदनांचे पुंजके ! आत्म्याचा बाह्य जगतातून किंवा अंतरजगतातून कोठूनही ठसा प्राप्त होत नाही आणि साहजिकच तिची प्रतिमाही मिळू शकत नाही.

समजा मी अंतरमनात जेव्हां आत्मा शोधू पाहतो तेव्हा मला काय दिसते ? तर तेव्हा मला केवळ उष्णता, थंडी, अंधार, प्रेम, द्वेष, राग,निर्विकार अशा कोणत्यातरी संवेदनाचं आढळतात.आत्मा नावाचे कोणतेही तत्व मला दिसत नाही.गाढ झोपेत घडते तसे माझी संवेदने कोणी काढून घेतली तर जोपर्यंत मला स्वत:चे ज्ञान होत नाही तोपर्यंत मला अस्तित्वच नसते असे म्हणावे लागेल. म्हणजेच संवदेनाखेरीज *माझ्यात* काहीही नाही. आणि असेलच तर केवळ मन असते आणि ते संवेदनांना बांधणारे, रचना करणारे सूत्र असते. हा ह्यूमचा ***अनात्मवाद*** होय.

## **ह्यूम आणि बौध्द**

ह्यूमचा अनात्मवाद हा बौध्दांचा अनात्मवाद आणि क्षणिकवाद यांच्याशी जुळणारा आहे. बौध्दांच्या मते आत्मा नावाचे द्रव्य नाही तर विविध अशा पाच मानसिक अवस्थांचे तो केवळ संघात असतो.या पंचस्कंधाच्या संघातातून ज्यास आत्मा म्हंटले जाते, अशा द्रव्याची कल्पना आपण तयार करतो. संघ विलग झाला की हा तथाकथित 'आत्मा' नष्ट होतो. या अवस्थासुध्दा सतत बदलल्या, क्षणभर टिकणा-या अशाचं असतात.

**आणि बौध्द तत्त्वज्ञानाचा परिचय नसतानाही आश्चर्यकारकरित्या ह्यूम असेच मत मांडतो !**